प्रकरण १

वीरशैव व सोन्नलगी सिद्धराम

प्राचीन काळापासून आपल्या भारत देशात अनेक जाती, अनेक धर्म आणि अनेक पंथांचे लोक एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये शैव, वैष्णव, जैन व बौद्ध असे धर्म आहेत. त्यामध्ये, वैष्णव विष्णू व विष्णूच्या दहा अवतारांची उपासना करतात. बौद्ध बुद्धाची आणि मुस्लिम अल्लाहची उपासना करतात. त्याचप्रमाणे शैव शिव व शिवाच्या अवतारांची उपासना म्हणजे लिंगाची उपासना करतात. म्हणजे ते 'लिंगायत' होय. शिवाची उपासना दोन प्रकारे केली जाते. यांना 'शैव' म्हणतात.

१) शिवाच्या मूर्तीची उपासना - यात त्रिनेत्रधारी शिव, पंचमुखी शिव, नटराज, काळभैरव इ. रूपातील शिवमूर्ती असतात.

२) देवळात स्थापित पाषाणाचे लिंग - यामध्ये शिवाची पिंडी आणि शाळुंकासह स्थापन केलेले ज्योतिर्लिंग, ऋषीमुनींनी स्थापन केलेली लिंगे, योगी पुरुषाची स्मारके, शरीरावर धारण करता येणारी लिंगे यांचा समावेश होतो.

भारतात जितकी शिवाची मंदिरे आहेत तेवढी इतर कोणत्याही देवाची मंदिरे आढळत नाहीत. जसे काश्मिरभागातील बर्फाने तयार होणाऱ्या अमरनाथ पासून ते शेवटच्या (द.भारत) टोकावरील रामेश्वर लिंगापर्यंत ज्योतिर्लिंगे ठिकठिकाणी आढळतात.

प्राचीन काळापासून 'शैव' धर्म भारतात असलेला आढळतो. या संप्रदायाचे वेगळे असे भेद पाशुपत, नाथ, कालामुख, कापालिक इत्यादी इतिहास व पुराणांतून पाहावयास मिळतात.

१) शिवउपासक असणारे सामान्य शैव.

२) शरीरावर लिंग धारण करणारे व लिंगाची उपासना करणारे वीरशैव होत. या दोन शैवांमधील मुख्य फरक म्हणजे दोघेही शिवाची भक्ती करतात. पण वेळेनुसार शैव इतर देवाचीही आराधना करतात. 'वीरशैव' किंवा लिंगायत मात्र शिवाची पूजा आपल्या गळ्यात धारण केलेल्या इष्टलिंगाच्या रूपाने करतात. त्यांची संपूर्ण निष्ठा ही शिवावरच असते. वीरशैवाशिवाय अन्य कोणीही शिवभक्त आपल्या शरीरावर लिंगधारण करीत नाहीत. ते फक्त शिवमंदिरातील स्थावरलिंगाची पूजा करतात. त्यांना 'सामान्य शैव' असे म्हणतात.[१] शिवोपासना संपूर्ण भारत, मध्य आशिया, इजिप्त, युरोपातील काही भाग यात प्राचीन काळापासून असलेली आढळते. ही उपासना लिंग रूपातच विकसित झालेली दिसते. या पंथाची वाङ्मय परंपरा वैष्णव आळवाराप्रमाणे शैव नायनारानीही समृद्ध केली आहे. त्यांच्यामध्ये उदार प्रेमभाव, समर्पणशील

सेवाभाव, दडपलेल्या स्त्री, शूद्रांचा कैवार, अहिंसेचा आग्रह आणि योग्य मार्गांनी जगताना वीरता व निर्भयता हे गुण असलेले दिसतात.[२] त्यांच्या पूजा-विधींवरून संप्रदाय व पंथ यांची माहिती मिळते. मध्ययुगात लोकभाषांना प्रतिष्ठा प्राप्त झाली कन्नड भाषा आणि संस्कृती यांच्या जडणघडणीत वीरशैवांचा वाटा मोठा आहे. म्हणूनच बारावे शतक कन्नड साहित्यात 'बसव-युग' म्हणून ओळखले जाते. उदा. वचनसाहित्याशिवाय हरिहर, राघवांक यांची प्रबंधकाव्ये प्रसिद्ध आहेत. हरिहराने 'रगळे' हे लोकछंद जोपासले. राघवांक चरित्र, विरुपाक्ष यांनीही काव्ये रचलेली आहेत. ११ व्या शतकातील देवरदासिमय्या पासून १७ व्या शतकातील सर्वज्ञापर्यंत वीरशैव वचनकारांची वैभवशाली परंपरा आहे. त्यामध्ये प्रभुदेव, बसवेश्वर, चनबसव, अक्कमहादेवी , सिद्धराम यांचा महिमा असल्याचे दिसून येते.[३]

वीरशैव संप्रदाय :

शिवाला शिव, महादेव, नटराज, भोलेनाथ अशी अनेक नावे आहेत. या शिवाची पूजा वीरशैव आपल्या तळहातावर लिंग ठेवून सर्व सुख-दुःख विसरून तल्लीन होऊन करतात. इष्टलिंग वस्त्रात बांधून, धातूच्या करंडकात ठेवून वीरशैव लोक ते गळ्यात, भूजेवर किंवा बगलेत धारण करतात. प्राचीन काळात लिंगे मस्तकावरही धारण करत असत हे हडप्पा आणि मोहेंजोदडो येथील उत्खननात मिळालेल्या मूर्तींवरून दिसून येते. काही देव देवतांच्या मस्तकावर शिवलिंग पाहावयास मिळते. उदा. पंढरपूरचा विठोबा, तुळजापूरची भवानीमाता, कोल्हापूरची आंबाबाई, बार्शीचा भगवंत काही ठिकाणी मूर्तीच्या तळहातावरही शिवलिंग असल्याचे आढळून येते. वीरशैव धर्मात काही प्राचीन धर्मग्रंथ प्रमाण मानले जातात. उदा. वेद, आगम वगैरे वीरशैव आणि शैवपंथाच्या आगमांना 'शिवागम' किंवा 'शैवागम' म्हणतात. शिवागम २८ आहेत. याचा उल्लेख ग्रंथात आढळतो.[४]

'वि' या धातूचा अर्थ ज्ञान किंवा विद्या असा आहे . वीर शब्दातील 'र' म्हणजे रमणे. शिवजीव / लिंगांगाचे एकत्व होणाऱ्या विद्येत जो भक्त रमतो तोच 'वीरशैव' होय. त्यातही पोटजाती आहेत.

१) सामान्य वीरशैव : जो शिवभक्त गुरूने दिलेल्या दीक्षेनंतर नियमाने इष्टलिंगपूजा करतो, गुरू-लिंग, जंगमाची सेवा इत्यादी आचारधर्माचे पालन करतो तो 'सामान्य वीरशैव' होय.

२) विशेष वीरशैव : जो सामान्य नियमांचे परिपालन करून वीरशैव षटस्थलाच्या विषयीची माहिती गुरूमुखातून घेतो व तशी साधना करतो, तो 'विशेष वीरशैव ' होय.

३) निराभारी वीरशैव : विशेष वीरशैव जेव्हा आपली सर्व कर्तव्ये पूर्ण करून संसाराच्या व्यापातून मुक्त होऊन विरक्तवृत्तीने जीवन घालवितो, तेव्हा त्याला 'निराभारी वीरशैव' म्हणतात.

लिंगीब्राह्मण कुळातील इष्टलिंगदीक्षा, क्रीयादीक्षा घेतलेल्या ब्रह्मचारी (अविवाहित) व्यक्तीस निराभारी पद प्राप्त होते.

तसेच वीरशैव संस्थापकाविषयी आजही वाद कायम आहे. बसवेश्वरांच्या पूर्वीपासून वीरशैव धर्म अस्तित्वात आहे. ते खालीलप्रमाणे -

१) वीरशैव धर्माची बैठक प्राचीन असून परंपराही प्राचीन कालापासून व्यवस्थित चालत आली होती. मात्र कालमानाने त्यात काही दोष निर्माण झाले होते, ते दोष दूर करण्याचे कार्य पंचाचार्यांनी केले आणि या धर्माची घडी व्यवस्थित बसविण्याचे कार्य, बसवेश्वर व आदी शिवशरणांनी त्यात सुधारणा केल्याचे दिसते. त्यामुळे लोक बसवेश्वरांनाच वीरशैवधर्माचे संस्थापक मानू लागले पण ही वस्तुस्थिती नाही. बसवेश्वरांनी आपला ब्राह्मणकुळातील उपनयन संस्कार नाकारून इष्टलिंगदीक्षा घेतली यावरून वीरशैवधर्म बसवेश्वरांपूर्वी अस्तित्वात होता [५] हे स्पष्ट होते.

२) बसवेश्वरांनी शिवगमातील तत्वज्ञानच कन्नडमध्ये सांगितले. हे कार्य करत असताना उपनिषदांतील व वेदागमातील संस्कृत वचनेच कन्नड-वचनात बसवेश्वरांनी जशीच्या तशी घेतलेली आहेत. वीरशैव धर्माचे संस्थापक असा बसवेश्वरांचा उल्लेख कोठेही आलेला नाही.

३) बसवेश्वरांनी स्वत: श्रीजातवेदमुनींकडून इष्टलिंगदीक्षा घेतली असल्यामुळे बसवेश्वरांनी लिंगपूजा सुरु केली नाही, हे उघड आहे. वीरशैव धर्माची षट्स्थल, अष्टावरण आणि पंचाचार ही तत्वे प्राचीन शिवगमांत वर्णिलेली आहेत. ती बसवेश्वरांच्या काळात नवीन आली नाहीत.

४) वीरशैव धर्माची स्थापना बसवेश्वरांनी केली नाही हे खरे असले तरी, त्यांनी केलेल्या धार्मिक व सामाजिक सुधारणा फार मोलाच्या आहेत. वीरशैव धर्माचे जे तत्व होते ते संस्कृत ग्रंथांत होतेच परंतु ते व्यवहारात आणण्याचे मोठे काम त्यांनी केले. वीरशैवधर्माला आलेली मरगळ त्यांनी दूर केली. समाजाची सर्व अंगाने सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. उद्योगांना महत्व दिले. वीरशैवधर्माच्या इतिहासाच्या दृष्टीने बसवेश्वर, सिद्धरामेश्वर, अल्लमप्रभू आणि वीरशैव शिवशरण-शरणींचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. [६]

जीव, जगत् व परमेश्वर ही तिन्ही रूपे एकाच परब्रह्माची आहेत. जीव, जगत् आणि परमेश्वर ह्या तिन्हींमध्ये विशिष्ट प्रकारचे अद्वैत मानणारे ते विशिष्टाद्वैत मत होय.[७] वीरशैव कोणाला म्हणावे ? स्कंदपुराणातील वर्णनाप्रमाणे तळहातावर इष्टलिंगाची एकाग्रतेने पूजा करणारे वीरशैव होय.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'वि' चा अर्थ विद्या, 'र' चा अर्थ रमणारे. जी विद्या शिव (लिंग) आणि जीव (अंग) यांच्या ऐक्याचे ज्ञान करून देणारी आहे, अशा विद्येत जे शैव लोक रमतात, सुख मानतात ते वीरशैव होत. वीरशैवांच्या आचारात सर्व विश्व सामावलेले आहे. त्यामुळे वीरशैवधर्म हा विश्वधर्म आहे. 'देह म्हणजे देवालय' आणि 'आत्मा म्हणजे परमेश्वर'. मूर्तिपूजा वीरशैवांना मान्य नाही. इष्टलिंगरूपात आत्मा आणि परमात्मा यांची पूजा केली जाते. सद्गुरुकडून शिष्य दीक्षा घेऊन इष्टलिंग घेतो व ते जीवनभर शरीरावर धारण करतो.

वीरशैव धर्माचे उल्लेख असलेले ग्रंथ संस्कृत, कन्नड, मराठी , तेलुगु, तमिळ व हिंदी भाषेतून उपलब्ध आहेत.

वीरशैव शिवसंस्कारामुळे जन्मापासून नेहमी शुद्धच असतात असे म्हटले जाते. सोळा संस्कारांप्रमाणे वीरशैवांत दशकर्मपद्धती आहे. गर्भावस्थेत बालकाला मातेमार्फत लिंगधारणा केली जाते. दीक्षासंस्कार (मुलगा/मुलगी) इष्टलिंगधारणा व मंत्रोपदेश गुरुकडून दिला जातो. विवाह आणि इतर मंगल कार्यांत पंचाचार्यांचे प्रतीक म्हणून पंचकलशाची स्थापना केली जाते. गुरूच्या व जंगमाच्या उपस्थितीत सर्व कार्ये पार पाडली जातात. या धर्मात प्रेताला अग्नी दिला जात नाही. देह म्हणजे देवालय मानले गेल्याने प्रेत न जाळता ते पुरले जाते. 'मरणे' म्हणजे 'शिवैक्य' किंवा 'लिंगैक्य' असे मानतात. मरणाचा शोक करू नये. वाजत गाजत प्रेतयात्रा काढून शेवटी योगासनाच्या अवस्थेत भूमीच्या गर्भात समाधी दिली जाते. जंगमपुरोहित मंत्रोच्चारण करत मृताला शिवलोकास गेल्याचे जाहीर करतो. जंगमपुरोहिताचे पादोदक सर्वत्र शिंपडले जाते. मंगलआरती केल्यानंतरच समाधी दिली जाते. श्राद्ध आणि पिंडदान वीरशैवात केले जात नाही. शास्त्रानुसार वीरशैव धर्म सर्वोत्कृष्ट मानला असल्याने यात व्यक्तिला षट्स्थल साधनेने एकाच जन्मात मुक्ती मिळते, असा उल्लेख 'परमेश्वरागमात' केला गेला आहे.

वीरशैवातील शक्तिविष्टाद्वैत, षटस्थल, अष्टाकरण, पंचाचार ही दर्शन या पाठात थोडक्यात अभ्यासावयाची आहेत.

<u>शक्तिविशिष्टाद्वैत</u> :- वीरशैव सिद्धांताला 'शक्ति विशिष्टाद्वैत' म्हणतात. वीरशैवाचा देव म्हणजे, ईश्वर म्हणजे परब्रह्म म्हणजे शिवच आहे. त्या शिवाच्या ठिकाणी शक्ती ही नेहमी वास करून असते. त्यांचे अस्तित्व नेहमी एकरूप असते. शक्तीमध्ये शिव व शिवामध्ये शक्ती आहे असे मानले जाते. विश्वाची निर्मिती करताना शिवाचा अंश असल्यामुळे त्यांच्याही ठिकाणी शक्ती असतेच. या दोन्हीमधला फरक असा की, परशिवाच्या ठिकाणची शक्ती दोन प्रकारची होती. स्थूल आणि सूक्ष्म. सूक्ष्म शक्ती शिवाच्या

आणि स्थूल शक्ती जीवाच्या आश्रयाने राहते.सूक्ष्म शक्तीच्या कारणाने जीव अल्पज्ञ हा अल्पकर्ता झाला आहे असे मानले जाते. शिव व जीव यांच्यात भेद असला तरी जीव हा शिवाचाच अंश आहे. [९]

धार्मिक दृष्टीने जीवाने शिवाशी समरस होणे हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट, 'मुक्ती मिळणे' असे मानले गेले आहे. जीवात्म्याला शिवामध्ये समरस होण्याचा मार्ग दाखविणारा वीरशैव दार्शनिक सिद्धान्त म्हणजे 'शक्ति विशिष्टाद्वैत सिद्धान्त' होय. मनुष्य शिवाचा अंश आहे मात्र याचे ज्ञान त्याला नसते. सदगुरूच्या दीक्षासंस्काराने मनुष्याचे दु:ख दूर होते व त्याच्या अल्पज्ञानाचे भक्तीत रूपांतर होते. भक्त, महेश इत्यादी षट्स्थल साधनेमुळे जीव शिवाशी ऐक्य पावतो. अशा मुक्ती मिळविण्याच्या भक्तिमार्गालाच 'शक्तिविशिष्टाद्वैत' म्हणतात.[१०] शिवाचा अंश असणारा जीव पुन्हा शिवामध्ये समरस झाल्याशिवाय कृतकृत्य होत नाही. जीवात्म्याला सद्गुरू दीक्षेद्वारे मलत्रयापासून मूक्त करण्यासाठी त्याच्या ठिकाणच्या अल्पज्ञत्वादी शक्ती भक्तिरूपाने परिवर्तन करतात. त्याची साधना वाढत जाते. साधनेमुळे श्रद्धा, निष्ठा, अवधान, अनुभव, आनंद आणि समरसता वाढते. याद्वारे साधक षट्स्थलांना प्राप्त होऊन शेवटी ऐक्यस्थली समरस भक्तिप्रभावाने आपल्या शक्तीचा विकास करून घेऊन, शिवाशी समरस होतो म्हणजेच मुक्ती होय.

विशेषाद्वैत – 'विश्व शेषश्च विशेषौ ईशजीवौ, तयोरद्वैत, विशेषाद्वैतम' ही विशेषाद्वैत शब्दाची व्युत्पत्ती आहे. एकाक्षर कोषात वि शब्दाचे, नेत्र, आकाश, पक्ष आणि परमात्मा असे अर्थ दिले आहे. 'वाति' म्हणजे जगताचा निर्माता अशा परमेश्वराला वि: म्हणून ओळखतात. शेष म्हणजे त्या परमात्म्याचा अंशभूत असा जीवात्मा असे म्हणावे लागेल. असा अंश व अशीरूपे असणाऱ्या जीव आणि परमात्म्याचा अभेद सांगणारा सिद्धान्त विशेषाद्वैत सिद्धान्त होय.

षटस्थल :– वीरशैव सिद्धान्ताप्रमाणे जीवाला शिवाशी ऐक्य साधावा यासाठी सहा स्थलांतून प्रगती करावी लागते असे सांगितले जाते. भक्त, महेश, प्रसादी, प्राणलिंगी, शरण, ऐक्य ही स्थले म्हणजे 'षट्स्थल'होत. षट्स्थल सिद्धान्त वीरशैव तत्वज्ञानाचा व लिंगांगसामरस्याचा गाभा आहे. वीरशैव तत्ववेत्यांनी 'स्थल' चा अर्थ 'परशिवब्रह्म' असा केलेला आहे. 'स्थ' हे स्थानवाचक व 'ल' हे लयवाचक आहे. जे तत्व सर्व प्राणिमात्रांना आश्रय देण्यास आणि शेवटी सर्व प्राणिमात्रांच्या लयासही कारणीभूत ठरते, त्या तत्वाला 'स्थल' म्हणावे असे 'मायिदेवांनी' अनुभव सूत्र ग्रंथात म्हटले आहे. हे स्थल परब्रह्म हा एकमेव असून त्याचे स्वरूप सत् चित्त व आनंदयुक्त आहे.[११]

स्वत:च्या ठिकाणी असणाऱ्या शक्तीच्या साहाय्याने परिशिवब्रह्म (स्थल) लिंगस्थल आणि अंगस्थल अशा या दोन 'स्थला'त अवतरते लिंग व अंग या दोन्हीमध्ये परशिवब्रह्म असते. लिंगाकडे भक्तिभावाने मार्गक्रमण करणाऱ्या जीवालाच अंग असे म्हटले जाते. लिंगाला वीरशैव धर्मात आदि नाही,

अंत नाही, जन्म नाही, मरण नाही. अंग मध्ये 'अ' म्हणजे परमेश्वर आणि 'ग' म्हणजे गमन करणे. जो परमेश्वराकडे गमन करतो तो उपासक, म्हणजेच 'अंग' होय. लिंगाचा व अंगाचा संयोग होणे याला वीरशैवांच्या तात्विक परिभाषेत संबंध म्हटले जाते यालाच 'लिंगांगसामरस्य ' असे म्हणतात.

वीरशैव तत्ववेत्त्यांनी 'लिंगांगसामरस्य ' आणि तत्वमसि या त्रिपादात्मक सूत्राची तुलना केलेली आहे. वीरशैवांच्या षट्स्थल विचारात लिंगांगसामरस्य या संकल्पनेचे स्पष्टीकरण तत्वद म्हणजे परमेश्वर, त्वंपद म्हणजे आत्मा आणि असिपद म्हणजे आत्म्याचा परमात्म्याशी घडणारा संबंध असा केला आहे. श्री नीलकंठांनी 'वीरमाहेश्वराचारसंग्रह' मध्ये तत्वं या पदाचे अशाच प्रकारे विवेचन केले आहे.[१२]

लिंगस्थल : षट्स्थल विवेचन ात लिंगस्थलाचे तीन मुख्य भेद सांगितले असून भावलिंग, प्राणलिंग व इष्टलिंग ही लिंगत्रयांची नावे आहेत. भावलिंग हे सत्स्वरूपी, प्राणलिंग हे चित्तस्वरूपी व इष्टलिंग हे आनंदस्वरूपी मानलेले आहे.

१) इष्टलिंग - आचारलिंग आणि गुरुलिंग

२) प्राणलिंग - शिवलिंग आणि जंगमलिंग

३) भावलिंग - प्रसादलिंग आणि महालिंग

दोन दोन लिंगाचे सविस्तर माहिती 'परमरहस्य' या ग्रंथात आलेली आहे. उपासक हा आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग आणि महालिंग या षडलिंगाची उपासना करीत मोक्षमार्गाच्या पायऱ्या चढत जातो. वीरशैवांना 'लिंगांगसामरस्या' शिवाय दुसरा मोक्ष नाही. म्हणून या षटस्थलसिद्धान्ताला 'मोक्षमार्गेकसोपान' असे म्हटले जाते.[१३]

अंगस्थल : अंगस्थलाचे - योगांग, भोगांग व त्यागांग हे प्रकार आहेत. योगांगाला कारण, भोगांगाला सूक्ष्म आणि त्यागांगाला स्थूल म्हटले आहे. यातूनच भक्तस्थल, महेश्वरस्थल, प्रसादीस्थल, प्राणलिंगीस्थल, शरणस्थल व ऐक्यस्थल ही सहा अंगस्थले निर्माण होतात. [१४]

षडांगे आणि त्याची सहा मुखे सांगताना वीरशैव तत्ववेत्ते पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाशाव्यतिरिक्त 'आत्मा' ही विचारात घेतात. तसेच लिंगस्थलातील सहा प्रकारांशी संबंधित असलेल्या सहा मुखांचे स्पष्टीकरण वीरशैवांच्या तात्विक ग्रंथामध्ये केलेले आढळते.

षटहस्त : षटस्थलातील सहाही स्थलांशी संबंधित असलेल्या षटहस्ताचे विवेचन केलेले दिसून येते. सहा स्थलांचे सहा प्रकारचे हस्त सांगितले आहेत. साधक यांच्या साहाय्याने शिवलिंगपूजा करीत असतो. षटस्थल या तत्वांचे एकत्रित विवेचन 'सिद्धान्तशिखामणी' या ग्रंथात सांगितलेले आहे. ४४ आणि स्थलाची ५७ मिळून अशी एकूण १०१ स्थले विवरून सांगितलेली आहेत.[१५] प्रत्येक स्थल आणि उपस्थले याबद्दल खालील प्रमाणे विचार आहेत.

भक्तस्थल आणि त्यांचे उपस्थल : गुरू, लिंग, जंगम यांच्या ठिकाणी परमेश्वराचे वास्तव्य असते, यांची पूजा करू इच्छितात ते भक्तस्थली आहेत, असे 'पारमेश्वरागमात' म्हटले आहे. या भक्तीतून चित्ताची शुद्धी होऊन ही लिंगांगसामरस्याची पहिली पायरी बनते. भक्तस्थलात उपासक आचार लिंगाची पूजा करतो. शिवयोगी शिवाचार्यांनी भक्तस्थलाची लिंगस्थलातील ९ आणि अंगस्थलातील १५ अशी २४ उपस्थले सांगितलेली आहेत.

महेश्वरस्थल आणि त्याची उपस्थाने : या स्थलात उपासक गुरू लिंगाची उपासना करतो. साधक लिंगपूजेत रत होऊन शक्तिपूर्वक जंगमाची पूजा भक्तस्थलात करतो. तर महेश्वरस्थलात हा परस्त्री, परद्रव्य वर्ज्य करून आपली लिंगनिष्ठा अधिक दृढ करतो असे 'परमेश्वरागमा'त म्हटलेले आहे. 'परमरहस्य' 'शिवरहस्य' आणि 'विरमाहेश्वराचारसंग्रह' या ग्रंथांमध्येही हाच विचार मांडलेला आहे.

प्रसादीस्थल आणि त्याची उपस्थले : यामध्ये जंगमपूजा केल्याशिवाय व शिवाला अर्पित केल्याशिवाय काही खात नाहीत.

प्राणलिंगीस्थल आणि त्याची उपस्थले : प्राणात लिंग आहे आणि लिंगात प्राण आहे अशी ज्याची भावना असते आणि जो सुख आणि दु:ख या दोन्हीच्या अतीत झालेला असतो, त्याला प्राणलिंगी म्हणावे असे 'परमरहस्य' आणि 'वीरमाहेश्वराचारसंग्रह' मध्ये म्हटले आहे.

शरणस्थल आणि त्याची उपस्थले : ज्याने धर्म, अर्थ आणि काम हे तीन स्वार्थ सोडलेले आहे, जो एकांतवस्थेत ध्यान करतो त्याला 'पारमेश्वरागमात' शरणस्थली म्हटलेले आहे. लिंग पती, पूजक सती अशी भावना यात असते.

ऐक्यस्थल आणि त्याची उपस्थले : या स्थलातील साधक महालिंगाची पूजा करीत असतो. आनंदभक्तीचे रुपांतर इथे समरसभक्तीत होते. इथे आत्मांगाने, भावहस्ताकडून महालिंगाची पूजा केली जाते. परमात्मा म्हणजे आपण स्वत:, अशी साधकांची अवस्था होते. अशा कैवल्यावस्थेत पोचलेल्या साधकासच ऐक्यस्थली म्हणावे.

परशिवब्रह्माचे ठिकाणी अविनाभावसंबंधाने दोन शक्तीची रूपे लिंग स्थलाच्या आश्रयाने राहतात आणि शक्तीचे दुसरे रूप हे अंगस्थलाच्या आश्रयाने राहते. अंगस्थलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या शक्तीच्या रूपाला भक्तिशक्ती आणि लिंगस्थलाच्या आश्रयाला राहणाऱ्या या कलाशक्तीला 'प्रवृत्ती' आणि भक्तिशक्तीला 'निवृत्ती' म्हटले जाते.

अर्पणसद्भाव : लिंगार्पित केल्याशिवाय वीरशैव कोणत्याही वस्तूचा, पदार्थाचा, विषयाचा उपभोग घेत नाही. 'लिंगार्पित कर्म परम हाचि धर्म' हे त्यांच्या जीवन जगण्याचे सूत्र असते. ही कर्मे

शारीरिक असोत, बौद्धिक वा भावनिक असोत अशा प्रकारच्या केलेल्या अर्पणाला अर्पणसद्भाव म्हणतात.

अष्टावरण : वीरशैव तत्वज्ञानात अष्टावरण, पंचाचार व षटस्थल ही दर्शने आहेत. अष्टावरणाची माहिती घेणे अत्यंत गरजेचे आहे. आवरण म्हणजे - झाकणे, लपवणे किंवा कुंपण घालणे असे होय. शिवभक्ताचे असेच रक्षण आठ आवरणे करीत असतात. काम, क्रोध, मत्सर आदी विकारांपासून व दुष्ट मनोवृत्तीपासून शिवभक्ताचे रक्षण करणे हेच मुख्य कार्य होय.

श्रेयमार्ग : शिवभक्ताचा श्रेयमार्ग म्हणजे मुक्तीचा सर्वोत्तम मार्ग मुक्ती मिळविण्याची प्रबळ इच्छा होय.

प्रेयमार्ग : जो श्रेयमार्गावरून चालतो अशा साधकाचे रक्षण अष्टावरण करतात. जीवनातील सर्व सुखे भोगण्याचा प्रयत्न करणे याला 'प्रेयमार्ग' म्हणतात. आत्म्यापासून आनंद मिळविण्याचा प्रयत्न करणे याला 'प्रेयमार्ग' म्हणतात. आत्म्यापासून मिळणारा आनंद हा संसारातील सुखांपेक्षा अधिक शाश्वत व प्रगत असतो.

साधक म्हणजे आत्मज्ञान मिळविण्यासाठी साधना करणारा मनुष्य. अष्टावरण म्हणजे साधकाची 'अंगे' होत. अष्टावरणातील गुरू, लिंग, जंगम ही आवरणे पूजनीय, विभूती, रुद्राक्ष व मंत्र ही पूजेची साधने व पादोदक व प्रसाद ही पूजेची फळे आहेत. असे वीरशैव मानतात. विभूती, रुद्राक्ष व मंत्र ही पूजेची साधने आहेत. पूजेनंतर लिंगावर पाणी घालून आणि गुरू व जंगम यांच्या पायावर पाणी घालून 'पादोदक' घ्यावे लागते व त्यांना अन्न समर्पित करून ते अन्न 'प्रसाद' म्हणून ग्रहण करावे लागते. ही पूजेची फळे होत. असे वीरशैवात म्हटले जाते. सर्व प्रश्नाच्या उत्तरासाठी वीरशैव तत्वज्ञानाचा परिचय हवा तो असा, वीशैवच नव्हे तर इतर भारतीय तत्वज्ञानाने आत्म्याचे अस्तित्व मानलेले आहे. प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे असे मानले गेले आहे. जीव मेल्यानंतर आत्मा शरीराला सोडून जातो असे म्हटले जाते. हा जीव म्हणजे आत्मा, त्यालाच तत्वज्ञानात 'जीवात्मा' व सर्व जगात आत्मा भरून राहिलेला आहे तो 'परमात्मा ' होय. जन्म-मृत्यू हे चक्र सतत चालू असते. या चक्रातून सुटका करून घेणे यालाच 'मुक्ती' किंवा 'मोक्ष' म्हणतात. वीरशैव तत्वज्ञानाने मोक्षाला 'लिंगांगसामरस्य' असे म्हणतात.[१६]

लिंगांगसामरस्य : वीरशैव तत्वज्ञानात परमतत्वाला 'लिंग' म्हणतात. जीवात्म्याला 'अंग' म्हणतात. 'अंग' 'लिंगाशी ' समरस होणे यालाच 'लिंगांगसामरस्य ' किंवा 'मोक्ष' म्हणतात. जीवात्मा परमात्म्याशी एकरूप झाला की, जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्तता मिळते. मुक्ती मिळविण्यासाठी भक्ती करावी लागते. पूजा-तप करून आपले चंचल मन स्थिर करावे लागते. एकाग्र करावे लागते. पूजा -

जपामुळे मन शुद्ध होते आणि शरीरात नांदणाऱ्या आत्म्याची जाणीव होते. या साधनेसाठी अष्टावरणे साहाय्यक ठरतात. म्हणून वीरशैव साधकाच्या जीवनात अष्टावरणांना महत्वाचे स्थान आहे.

१) गुरू : भारतीय संस्कृतीत सर्व धर्मांनी गुरूला अग्रस्थान दिलेले आहे. वीरशैवांनीही गुरूला विशेष स्थान दिले आहे. असा मन्मथस्वामींनी 'परमरहस्य' या ग्रंथात उल्लेख केलेला आहे. शिव म्हणजे परब्रह्म. परब्रह्म सर्वश्रेष्ठ असे तत्व, पण शिव आपल्याला कधी भेटत नाही, बोलत नाही, मनातील शंकांचे समाधान होत नाही. पण हे सर्व गुरुकडून साध्य होते. म्हणून गुरू हा शिवाशिवाय श्रेष्ठ आहे. वेद व आगम यांचा अभ्यास करून मनुष्य गुरू होऊ शकतो. कांही तत्ववेत्यांनी वीरशैवाला गुरुमार्गी धर्म म्हटले आहे. प्रत्येक वीरशैवाला गुरू असलाच पाहिजे आणि संपूर्ण कुटुंबाचा गुरू एकच असला पाहिजे. त्याच गुरूला 'कुलगुरू' म्हणतात. गुरू हे पुरुषच असत. वीरशैव धर्म जगद्गुरू पंचाचार्यांनी स्थापले असे मानले जाते. शिष्याच्या अंगी असलेल्या रज व तम या गुणांचा शोधून त्याला शिवतत्वाचा उपदेश करतो तो गुरू होय, गुरू हा गुणातीत व रूपातीत असतो. तो निर्गुण व निराकार शिवाचे ज्ञान देतो. स्वत: आचरण करणारा व शिष्याकडून आचरण करवून घेणारा 'आचार्य' होय. जगद्गुरूविषयी समाजात पूज्यबुद्धी असून गुरूला शिवासमान मानतात. त्यामुळे त्याची पूजा केल्याने भगवान शिवाची पूजा केल्याचे फळ मिळते असे वीरशैव मानतात.

गुरू हा वय व लिंगामुळे पूज्य ठरत नाही तर तो गुणामुळे पूज्य ठरतो. गुरूची लक्षणे अनेक ग्रंथांत सांगितली आहेत. एका कुळाचा गुरू एकच असावा ही वीरशैवात परंपरा आहे. त्याच गुरुकडून घरातील सर्व व्यक्ती लिंगदीक्षा व मंत्रोपदेश घेतात. गुरू एकच असतो पण त्याच्या कार्यामुळे त्याला दीक्षागुरू, शिक्षागुरू आणि ज्ञानगुरू अशी नावे दिली गेली आहेत. दीक्षागुरूमध्ये गुरू शिष्याला (स्त्री-पुरुष) लिंगदीक्षा देतो. दीक्षेशिवाय मुक्ती नाही असे मानले आहे. त्यामध्ये वेददीक्षा, मंत्रदीक्षा, क्रियादीक्षा असे दीक्षेचे प्रकार आहेत.

'नम: शिवाय' हा पंचाक्षर व ॐ जोडल्यावर 'षडाक्षर मंत्र' हे शिवाचे मंत्रमय रूप आहे. यामध्ये अनेक दीक्षांचा समावेश आहे. दीक्षागुरू - शिक्षागुरू दीक्षेनंतर गुरू शिष्याला लिंगपूजेचे नियम व स्वत:च्या प्राणाप्रमाणे लिंग शरीरावर धारण करण्याचे शिक्षण देतात. ज्ञानगुरू-शिष्याच्या मनातील सर्व संशय दूर करतात. शिवाद्वैत ज्ञानाचा उपदेश केल्यामुळे त्यांना 'ज्ञानगुरू' म्हणतात. शिष्याच्या घरी होणाऱ्या मंगल कार्यात गुरूला पाचारण केले जाते. म्हणून अष्टावरणात गुरूला प्रथम स्थान आहे. [१७]

२) लिंग : सिंधुसंस्कृतीच्या उत्खननातून भारतात शिवाची उपासना प्राधान्याने लिंगरूपातच होती हे सिद्ध झाले आहे. लिंग हे जननेंद्रियाचे प्रतीक आहे असे मानले जाते. लिंगोपासना प्राचीन मिश्र संस्कृती, जपान, बॅबिलोन, असिरियन, प. आशियात विशेष रूढ होती. लिंग घडविताना पाषाण किंवा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

स्फटिकाचा उपयोग करतात. लिंगात बाण, पीठ व गोमुख हे तीन भाग असतात. लिंगाच्या गोलाकार पिंडाला 'बाण' म्हणतात. त्याच्या खालच्या बैठकीस 'पीठ' व पाणी वाहून नेणाऱ्या निमुळत्या भागाला 'गोमुख' म्हणतात.

पंचसूत्रे – १) प्रथम बाणाचा परीघ मोजावा (बाणाचे गोलाकार माप) २) त्या परिमाणाएवढी गोलाकार पीठाची लांबी असावी. ३) तेवढीच पीठाची रुंदी असावी. ४) त्या परिघाएवढीच पीठाची उंची असावी. ५) परिघाच्या निम्म्या मापाएवढी गोमुखाची लांबी असावे

दीक्षा न घेता/असंस्कारित लिंग इष्टलिंग होऊ शकत नाही. मंदिरातील लिंग म्हणजे स्थावर लिंग हातातील लिंग म्हणजे इष्टलिंग. हे फक्त वीरशैवांजवळ असते. लिंगाला प्राणासारखे जपावे. दिवसातून तीनदा तरी लिंगपूजा करावी. हे लिंग गुरुकडूनच घ्यावे लागते. लिंग कपड्यात गुंडाळून चांदीच्या पेटीत ठेवतात. या पेटीला, सज्जिकेला मराठीत 'बेल' म्हणतात. त्याला बांधलेला दोरा छत्तीस पदराचा असावा.

इष्टलिंग डाव्या हातावर घेऊन पाणी, पुष्प अर्पितात. सूर्याला नमस्कार दोन्ही हातांनी मिळून करता येतो म्हणून डावा हात कनिष्ठ मानू नये, सुतक पाळू नये असे वीरशैव तत्वज्ञान सांगते. पंचसुतके- प्रेतसुतक, बाळाचा जन्म, जननसुतक, उष्टे अन्न नाकारणे, उच्छिष्टसुतक आणि स्त्रीने चार दिवस मासिक विटाळ पाळणे म्हणजे रज:सुतक होय. यांचा वीरशैवाने निषेध केला आहे. वीरशैवात जिवंतपणी व मृत्यूनंतरही लिंग असते. ते लिंगासोबत जगतात व लिंगासोबतच मरतात. लिंगाच्या धारणेमुळे साधकाचे दुर्विचार दूर होऊन त्याचे रक्षण होते. [१८]

३) जंगम : धर्मनिष्ठ आचरणाने कोणीही वीरशैव जंगम होऊ शकतो. जंगम कुलाचे काही जंगम आहेत. पंच सद्गुरूंची निवड अशा जंगमकुलातून केली जाते. गुरू, लिंग, जंगम एकाच परमात्म्याची तीन रूपे मानली जातात.[१९] 'लिंगमुखं वै जंगम:' या उक्ती प्रमाणे लिंगाला जे जे अर्पण करावयाचे ते जंगमाला अर्पण करणे चांगले असे म्हटले आहे. गुरूलिंगाप्रमाणे जंगमाच्या ठिकाणी आसक्ती बाळगणाऱ्या शिवभक्तांचे महत्व बारा श्लोकांत आहे. [२०] जन्म आणि मरण या गमनागमनापासून जो मुक्त आहे तो जंगम होय. वीरशैव धर्माने शिवयोग्याला जंगम असे म्हटले आहे. तो जातिवाचक शब्द नाही. आजच्या काळात सर्वच जंगम शिवाज्ञानसंपन्न नसले तरी शुद्ध आचार-विचार व व्यवहार यामुळे ते वीरशैव समाजात पूज्य मानले जातात. जंगम म्हणजे चरलिंग म्हणजे चालते-बोलते लिंग म्हटले आहे. त्यांचे 'स्वयजंगम' व 'परजंगम' असे दोन प्रकार आहेत. जंगम साधकाला शिवज्ञानाचा उपदेश करून विकारांपासून त्यांचे रक्षण करतो म्हणून त्याला आवरण म्हटले आहे.[२१]

४) विभूती : विभूती आवरण असून वीरशैवांनी लिंगपूजेसाठी भस्म धारण करणे आवश्यक आहे. भस्माशिवाय कपाळ म्हणजे शिवालयाशिवाय गाव, ते व्यर्थ आहे असे शास्त्रवचन आहे. भस्माचे

प्रकार-विभूती, भसित, भस्म, क्षार व रक्षा हे होत.[२२] भस्मधारण ही शिवोपासनेची खूण आहे. सर्वांगावर भस्म धारण केल्यामुळे शरीरातील मन परिपक्व होते असे याचे महत्व आहे. अनेक मंत्रांचा उच्चार करीत वाळलेल्या शेणाचे चूर्ण करतात, ते चूर्ण जाळतात व गोमूत्राचा वापर करून भस्म तयार करतात. भस्म बनविण्याचे अनुकल्प क्रिया, उपकल्प क्रिया, अकल्प प्रक्रिया आहेत. पंचाक्षर मंत्राचा उच्चार करून भस्माधारणविधी पार पाडले जातात. ते तीन तऱ्हेने १) भस्मस्नान २) भस्मोद्धलन ३) त्रिपुंड्रधारण केली जाते. हाताचा अंगठा व अंगुली सोडून मधल्या तीन बोटांनी भस्म लावतात. भस्म रेषा सरळ व ठळक असावी. भस्म लावल्याने मनेरथ पूर्ण होतात. शरीर, मन व वाणी शुद्ध होऊन पापाचे क्षालन होते असे वीरशैव मानतात. [२३]

५) **रुद्राक्ष :** 'रुद्राचे नेत्र' म्हणजे 'रुद्राक्ष' होय [२४] रुद्र म्हणजे शिव. शिवाच्या नेत्रातून निर्माण झालेल्या जलबिंदूपासून जे वृक्ष निर्माण झाले त्याच्या बीजांना 'रुद्राक्ष' म्हणतात. रुद्राक्षांच्या संदर्भातील एका अख्यायिकेवरून त्या बिजाला रुद्राक्ष असे नाव मिळाले. रुद्राक्षाला एका मुखापासून ते चौदा पर्यंत मुखे असतात. वेगवेगळी मुखे असलेले रुद्राक्ष धारण केल्याने वेगवेगळी फळे मिळतात. ते योग्य जागी धारण करावे असे वीरशैवामध्ये सांगितले आहे. एक मुखी ते चौदा मुखी रुद्राक्षांचा वापर वीरशैव करू शकतात. रुद्राक्ष तांब्याच्या रंगाचा, टणक, टपोरा व काटेरी असावा. जुना नसावा, सोने घासण्याच्या दगडावर रुद्राक्ष घासला तर रेघ उमटली पाहिजे असे वीरशैव मानतात.[२५]

६) **मंत्र :** ज्याच्या मननाने रक्षण होते. त्याला मंत्र म्हणतात. पंचाक्षरी हा शिवाचा साक्षात्कार घडविणारा वीरशैवाचा मंत्र आहे. 'नमः शिवाय'. नमः या शब्दाने जीवाचा बोध होतो. नमस्कार करणारा जीव व मंगल परंपरा देणारा शिव असतो. 'आय' यामुळे उपास्य व उपासक, जीव-शिवाचा अभेद बोध होतो. हे मंत्र ॐ ने जोडले तर 'षडाक्षर मंत्र' तयार होतो.[२६] मंत्राचे मूळ 'मुल, मंत्र विद्या प्राप्तीचे कारण होय'. म्हणून याने विद्या प्राप्त होते. सतत जप केला तर सर्व प्रकारे कल्याण होते याला 'शिव' म्हणतात. शिवाचे सूचन या मंत्रात एकवटल्याने हे 'शिवसूत्र', पाच अक्षराचा असल्याने 'पंचाक्षर' म्हणतात.

षडाक्षर मंत्र – वर सांगितल्याप्रमाणे पंचाक्षर मंत्राअगोदर ॐ लावल्यास षडाक्षर मंत्र तयार होतो. ॐ ला प्रणव म्हणतात. ॐ मधील अ, उ, म म्हणजे सत, चित् व आनंद यांचा बोध होतो, ॐ हे बीज, 'उमा' ही शक्ती व शिव हे कीलक आहेत. मंत्र १०८ वेळा व घर, गाईचा गोठा, अरण्य, उद्यान, पर्वत व देवालय अशा ठिकाणी जपावा. दिशेनुसार मंत्र जपावा.

पूर्व - इच्छाप्राप्ती	दक्षिण - शत्रुनाश
पश्चिम - धनप्राप्ती	उत्तर - शांतिप्राप्ती

७) **पादोदक :** पादोदकाचा तात्विक अर्थ - शिवाच्या परमानंद स्वरूपाला 'पाद' म्हणतात. आनंदाच्या ज्ञानाला 'उदक' म्हणतात. दोहोचे ऐक्य म्हणजे 'पादोदक' होय. वीरशैवाच्या पूजापद्धतीनुसार गुरुलिंग अथवा जंगमाच्या पादपूजेने प्राप्त पवित्र चरणामृतासही पादोदक म्हणतात. ते सेवन केल्याने मनाची मलिनता दूर होऊन स्वस्वरूपाच्या ज्ञानाच्या उदयाची योग्यता प्राप्त होते. जंगम व गुरू पादोदक न मिळाल्यास लिंग पादोदक तरी प्रतिदिन वीरशैवाने केलेच पाहिजे. त्यामुळे साधकाच्या मानसिक व शारीरिक दोषांचे निवारण होते असे वीरशैवाचे मत आहे.[२७] मनुष्य गुरुसमोर नतमस्तक होतो तेव्हा त्याचा अहंकार कमी होतो. पादोदकामुळे जन्ममरणासून शिवभक्ताची सुटका होते. त्याला परमज्ञानाची प्राप्ती होते व त्याचे रक्षण होते. म्हणून पादोदक हे 'आवरण' म्हणजे रक्षाकवच होय.[२८]

८) **प्रसाद :** प्रसाद म्हणजे प्रसन्नता होय. प्रत्येक व्यक्तीने भोग्य व धार्य वस्तू गुरू, लिंग, जंगमास समर्पित करून त्याचा अवशिष्ट भाग प्रसाद म्हणून ग्रहण करावा. त्यामुळे शिवार्पित वस्तूंना प्रसाद म्हटले आहे. प्रसाद व पादोदक स्वीकारताना उच्छिष्ट सूतकाचा दोष वीरशैव आचार्यांनी मानलेला नाही.[२९] पंचेंद्रियापासूनचे शब्द, श्रवण, स्पर्श, रूप, रंग, रस व गंध हे सर्व भाव शिवाला अर्पण केल्यावर ते प्रसादरूप होतात. विषयप्रसाद सेवन केल्यावर त्यांची बाधा होत नाही. मन हे सहावे लिंग मानले आहे. मनामुळेच मनुष्य कर्म करतो व तो सर्व इंद्रियांचा स्वामी आहे. मिळणारे सुख हा मनाचा 'विषय' असून तो महालिंगाला अर्पण केल्यावर 'तृप्तिप्रसाद' मिळतो. वीरशैवात पदार्थापेक्षा प्रसादाला महत्व आहे. अशा प्रकारे मनुष्याला हे अष्टावरण महत्वाचे आहेत. म्हणून वीरशैवानी त्यांना 'कवच' असे संबोधले आहे. आणि त्यांना मनुष्याचे आवरण मानले आहे.

पंचाचार : आचार म्हणजे वर्तणूक, वागणूक होय, वेदआगम यांना प्रमाण असलेले वर्तन म्हणजे 'आचार' होय. वीरशैव धर्मात गुरूला आचार्य किंवा शिवाचार्य म्हणतात. आचार्य म्हणजे सर्व शास्त्राचे जे अध्ययन करतात, शिष्यांना शिकवितात, स्वत:ही ते आचरणात आणतात. त्यांना आचार्य म्हणतात. आचारशील ज्ञानी मनुष्यावर भगवान शिवाची निरंतर कृपादृष्टी असते. वीरशैव सिद्धान्तात पाच आचार सांगितले आहेत.

१) **शिवाचार :** सृजन, स्थिती, संहार, निग्रह व अनुग्रह अशा शक्तियुक्त शिव आचार म्हणजे शिवाचार होय. प्रत्येक वीरशैवाने शिवाला परब्रह्म मानलेच पाहिजे. इतर देवतेची उपासना न करता फक्त शिवाचीच उपासना करणे हे त्यात महत्वाचे मानले जाते. मी जे जे काम करतो ते ते तुझी आराधना म्हणून करतो. प्रत्येकाने अशा भावनेने वागावे. सर्व जग शिवमय आहे हा विचार नेहमी मनात बाळगावा. शिव हे सत्व, रज आणि तम या त्रिगुणांच्या अतीत आहेत. तसेच सत, चित व आनंदस्वरूप आहेत. शिवच माता-पिता, बंधु, सखा, द्रव्य, सर्वस्व आहे. हा भाव आपल्या हृदयात दृढ झाल्यास 'सर्व शिवमय

जगत' याचा आपल्याला अनुभव येईल. शिव हा जीवात असतो हे सामान्यांना कळत नसते. वीरशैवाच्या आचार्यांनी अत्यंत सूक्ष्मपणे विचार करून वीरशैवाचे जीवन सर्वतोपरी परिशुद्ध राहावे म्हणून दक्षता घेतली आहे. तसेच सामान्य पदार्थाच्या शुद्धीपासून अंत:करणातील भावशुद्धीपर्यंत तपशीलवार विवेचन केलेले आहे.

२) लिंगाचार : गुरुकडून प्राप्त झालेल्या इष्टलिंगाहून दुसरे श्रेष्ठ दैवत पृथ्वीवर नाही या भावनेचे चिंतन म्हणजे लिंगाचार. प्रत्येक वीरशैवाने लिंग शरीरावर धारण करून त्याची पूजा केली पाहिजे. लिंग व अंग यांचा अन्योन्य संबंध आहे. मुक्ती/शिवप्राप्तीसाठी लिंगाची पूजा करावीच लागते. या पूजेमुळे निसर्गातील सर्व वस्तू किंवा ठिकाण आपली जागा सोडत नाहीत असा उल्लेख मन्मथस्वामीनी केला आहे.[३०] भक्ताने तळहातावर लिंग घेऊन पाणी घालून ते पाणी प्यावे. प्रत्येक कार्यात जन्मापासून मृत्यूपर्यंत लिंग व पूजा हे वीरशैवाने केलीच पाहिजे. म्हणजे त्याला पहिल्याच जन्मात मोक्ष मिळतो. ही लिंगदीक्षा एकाच गुरुकडून कुटुंबातील सर्वांनी घ्यावी असे बंधन आहे.

३) सदाचार : वीरशैवाने आपले काम प्रामाणिकपणेच करावे. स्वत:साठी, कुटुंबासाठी नैतिक मार्गानेच द्रव्य जमवून त्यातील काही जंगम व गुरुसाठीही दिले पाहिजे. सर्वांना शिवासमान पूज्य मानले पाहिजे. आपसात भेदभाव बाळगू नये. शुद्ध चारित्र्य, धार्मिक व नैतिक आचरण या गोष्टींचा विचार करून नातेसंबंध जोडावेत. उच्चनीच मानू नये या आचरणास 'सदाचार' म्हणतात. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप, ध्यान या मार्गानेच वीरशैवाने आचरण करायला हवे असा उल्लेख वीरशैव धर्मात आढळतो.[३१]

४) गणाचार : वीरशैव व्यक्तीचे समाजघटक म्हणून जे कर्तव्य असते त्यानुसार वागणे याला 'गणाचार' म्हणतात. त्याने शिवनिंदा ऐकणे किंवा पाहणे वर्ज्य मानले आहे. इतरांशी दुर्व्यवहारही त्याने सहन करू नये. समाजोन्नतीसाठी त्याने झटावे. अन्यायाचा विरोध करावा. पंचाचाराने व्यक्ती व समाज यांचा परस्परसंबंध चांगला राहून त्यांचा धार्मिक व नैतिक दृष्टीने विकास व्हावा. प्राणिमात्रावर दया दाखवून एक विकसित व सुसंस्कृत समाजजीवन घडवावे. या गोष्टी साधण्याचा प्रयत्न वीरशैवाने करावा असे सांगितले जाते. शिवाचा, शिवस्थानाचा, शिवभक्ताचा अवमान करणाऱ्यांना प्राणदंड द्यावा. गणाचारातून वीरशैवांचे धैर्य, शौर्य आणि निर्भयता हे गुण दृष्टीस येतात. गणाचारात शीलाला खूप महत्व वीरशैवाने दिलेले आहे.[३२]

५) भृत्याचार : पृथ्वीवर शिवभक्त श्रेष्ठ असून मी त्यांचा सेवक आहे असा संकल्प करणे म्हणजे 'भृत्याचार' होय. वीरशैवाने शिव, शिवाची लिंगरूपे आणि गुरू यांच्याशी विनम्रभावाने आणि दास्यवृत्तीने वागले पाहिजे. कारण तोच त्यांचा धर्मचरणाचा मार्गदर्शक असतो. शिवशरण यांच्याशी 'दासोऽहं' भावनेने

वागले पाहिजे. सर्व वीरशैव ही शिवाची लेकरे असून सर्वांनी बांधव या नात्याने वागावे. प्राणीमात्रावर दया करावी. भृत्याचार म्हणजे प्रत्येक वीरशैवाने समाजाचा सेवक आणि प्राण्यांचा मित्र या भावनेने वागणे होय.[३३] 'दासोऽहं' याचा अर्थ मी दास आहे. सर्व त्याग करण्याची तयारी असावी, व्यसनांचा अवलंब करू नये, शिवभक्त हाच श्रेष्ठ होय.

अहंकार म्हणजे सर्वनाशाचे मूळ आहे. भृत्य भावानेच समाजातील लोकात स्नेहभाव, सहकारभाव आणि बंधुभाव निर्माण होईल. परस्परांतील द्वेष, मत्सर, कटुता आणि शत्रुता या दुर्गुणांचा नाश होईल. सर्वत्र स्नेह, समाधान, शांती अवतरेल असे वीरशैव सिद्धान्तात म्हटले आहे.[३४]

बाराव्या शतकात धर्मसुधारक व शरणश्रेष्ठ बसवेश्वरांनी वीरशैव धर्माला भक्तिमार्गाचे रूप प्राप्त करुन दिले. वीरशैव अनुयायात केवळ लिंग बांधून, कपाळावर भस्म लावून शिवनामाचा जप करणारे भोळे-भाबडे भक्तजन तसे षट्स्थल, पंचाचार व अष्टावरण यात वर्णिलेल्या आचाराचे काटेकोर पालन करणारे क्रियाशीलही आहेत. वीरशैवांचे शक्तिविशिष्टाद्वैत तत्वज्ञान व षट्स्थल साधना ही धर्माची तात्वीक अंगे आहेत. तर अष्टावरण व पंचाचार यात धर्माची मूलतत्वे असून त्यात साधकाच्या आचरणावर अधिक भर असल्याने त्यांना आचारधर्म म्हणून संबोधता येईल.

पंचपीठ : वीरशैव धर्माची स्थापना जगद्गुरू पंचाचार्यांनी केली अशी माहिती शिवागमात आलेली आहे. शिवागमात वीरशैवधर्माच्या मूळतत्वांचा उपदेश सर्वात आधी कैलासात शिवाने पार्वतीला व शिवगणांना केला. या पाच शिवाज्ञेने पूर्वोक्त पाच गणांनी भूतलावर वेगवेगळ्या युगात वेगवेगळे अवतार घेतलेले होते असे वीरशैव धर्मात मानले जाते. वीरशैव या अवतारात घेतलेल्या व्यक्तिकडूनच धर्माची स्थापना करवितात.

शिवाची पाच मुखे - सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष आणि ईशान.

पाच गोत्रपुरुष - वीर, नंदी, वृषभ, भृंगी आणि स्कंद

या गोत्राचे पहिले पाच आचार्य म्हणजे पंचाचार्य होय. वर सांगीतलेल्या पाच आचार्यांनी प्रसिद्ध पाच शिवलिंगापासून अवतार घेऊन पाच पीठांची स्थापना केली. याची माहिती स्वयंभू नावाच्या आगमात दिली आहे. ही पीठे अत्यंत प्राचीन असल्याचे पुरावे आहेत. वेगवेगळे आचार्य, परंपरा, पंचपीठाची माहिती, संस्थापक, अवतारस्थाने इ. विषयी माहिती ' वीरशैव पंचपीठ परंपरा' या ग्रंथात मिळते. त्या पंचपीठाची माहिती थोडक्यात खालील प्रमाणे -

१) **श्री जगद्गुरू रेवणाराध्य (रंभापुरी पीठ)** : शिवाच्या आदेशानुसार श्री रेवणराध्य वीरशैव धर्माच्या स्थापनेसाठी आंध्रामर्धील कोलनुपाक (कोल्लीपाक) येथील सोमेश्वर लिंगापासून प्रत्येक युगात अवतार घेत आले. त्यांची वेगवेगळ्या युगात वेगवेगळी नावे होती. कलियुगात रेवणाराध्य

असे नाव होते. सोमेश्वर लिंगापासून रेणुकाचार्याचा अवतार झाला. अगस्त्यमुनीच्या विनंतीवरून त्यांनी वीरशैवसिद्धान्ताचा उपदेश केला. या धर्माच्या प्रचारासाठी रेणुकाचार्यांनी बाळेहोन्नूर या ठिकाणी धर्मपीठ स्थापले, तेच 'श्री रंभापुरी पीठ' होय. त्यासच वीरपीठ किंवा वीरसिंहासन असे म्हणतात. या लिंगाच्या स्थापनेबद्दल रामायणातील एक कथाही सांगितली जाते. आज रंभापुरी पीठावर श्री १००८ जगद्गुरु प्रसन्न रेणुकवीर सोमेश्वर शिवाचार्य हे अधिकारसंपन्न आहेत. ते विद्वान, शिष्यप्रिय, कर्तबगार, तरुण अचार्य आहेत. धर्मप्रचाराच्या व लोकोपयोगी शिक्षणाच्या अनेक योजना हाती घेऊन ते त्या पार पाडत आहेत.

२) **श्री जगद्गुरू मरुळाराध्य (उज्जयिनी पीठ) :** स्वयंभू आगमात सांगितल्याप्रमाणे शिवाच्या आज्ञेवरून श्री जगद्गुरू मरुळाराध्य, वीरशैवधर्माच्या स्थापनेसाठी क्षिप्रा नदीच्या काठावर वटक्षेत्रातील सिद्धेश्वर लिंगापासून प्रत्येक युगात अवतार घेत आले आहेत. त्यांची अनेक रूपे सांगितली जातात. कलियुगात मरुळाराध्य शिवाचार्य नावाने ते प्रसिद्ध झाले.

मध्य युगात उत्तरेकडे राजकीय परिस्थिती बिघडली. मोगलांच्या राजवटीत हिंदूच्या अनेक तीर्थक्षेत्रांची हानी झाली. याचा धक्का या तीर्थक्षेत्राला लागल्यामुळे ते कर्नाटकातील बेल्लारी जिल्ह्यातील उज्जयिनी येथे हलविले गेले. या पीठाला 'सद्धर्म सिंहासन' असेही म्हणतात. या पीठाचे सांप्रतचे अधिपती श्री १००८ जगद्गुरू सिद्धेश्वर शिवाचार्य हे असून त्यांनी आपल्या योगबलाने मानवी जीवनाची शतायुषी मर्यादा ओलांडली आहे. त्यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून १००८ जगद्गुरु मरुळसिद्ध यांना पट्टाभिषेक केला आहे.

३) **श्री जगद्गुरू एकोरामाराध्य (केदारपीठ) :** श्री एकोरामाराध्यांनी, शिवाच्या आदेशानुसार वीरशैव मताच्या स्थापनेसाठी द्राक्षाराम क्षेत्रातील श्रीरामनाथ लिंगापासून अवतार घेतला. त्यांची वेगवेगळ्या युगात वेगवेगळी नावे आहेत. कलियुगात एकोरामाराध्य असे नाव होते. वेगवेगळ्या अवतारात श्री एकोरामाराध्यांनी धर्मप्रसारासाठी हिमालयात एका धर्मपीठाची स्थापना केली. ते 'केदारपीठ' किंवा 'वैराग्यसिंहासन' होय. कृतयुगात त्र्यक्षर शिवाचार्याकडून सूर्यवंशातील राजा मान्धाता यांनी शिवसिद्धांताचा उपदेश प्राप्त करून संपूर्ण आयुष्य या पीठाच्या सेवेत घालविल्याने त्याची शिलामूर्ती तेथे उभारण्यात आली. घंटाकर्णानी द्वापारयुगात इतर देवाचे नाव कानावर पडू नये म्हणून कुंडला ऐवजी कानात घंट्या घातल्या. म्हणून त्यांना घंटाकर्ण म्हटले जाते. तेथे एक मूर्ती आहे ती मुनी व्यासांची मुर्ती आहे असे लोक सांगतात. कलियुगाच्या सुरुवातीला पीठाचे जगद्गुरू एकोरामाराध्य हे होते. पुराणकाळात बाणासुराची कन्या उषा शास्त्रांचा अभ्यास करून गुरूच्या कृपेने मोठी विदुषी झाली. उषा व तिचा पती

अनिरुद्ध यांची प्रेमकहाणी प्रसिद्ध आहे. त्यांनी गुरुसेवा म्हणून त्यांच्या निवासासाठी भव्य मठ बांधून दिला तो आज उषामठ किंवा उखीमठ म्हणून ओळखला जातो. महाभारतकालीन राजा जनमेजयाने भूमिदान केल्याचा उल्लेख असलेला ताम्रपट आजही तेथे आहे. या पीठाच्या जगद्गुरूंना 'रावल' ही उपाधी असून टेहरी नरेश हे या पीठाचे शिष्य आहेत. गढवालच्या इतिहासात या पीठावरील ३२४ जगद्गुरूंची यादी प्रसिद्ध झाली आहे. सध्याचे रावल श्री सिद्धेश्वर लिंग शिवाचार्य या पीठाचे ३२७ वे रावल आहे. भीमाशंकरलिंग शिवाचार्य हे या ३२८ वे रावल असून या पीठाचे गोत्रपुरुष वृषभेश्वर असून शाखा घंटाकर्ण आहे.

४) **श्री जगद्गुरू पंडिताराध्य (श्रीशैलपीठ) –** श्री जगद्गुरू पंडिताराध्य यांनी शिवाच्या आज्ञेने वीरशैव धर्माच्या स्थापनेसाठी आंध्र प्रदेशातील श्रीशैल क्षेत्रात 'मल्लिकार्जुन ' ज्योतिर्लिंगापासून चारी युगात वेगवेगळ्या नावाने अवतार धारण केला. कलियुगात त्याचे पंडिताराध्य असे नाव होते. श्री पंडिताराध्यानी वीरशैव धर्माच्या प्रचारासाठी श्रीशैल येथे एका धर्मपीठाची स्थापना केली. त्याला श्रीशैल पीठ / सूर्यसिंहासन अशी नावे आहेत. कलियुगातले श्री पंडिताराध्य हे या पीठाचे पहिले आचार्य. या पीठाची आचार्यपरंपरा मोठी आहे. गोत्रपुरुषाचे नाव भृंगीश्वर असून शाखा धेनुकर्ण आहे. सध्या या पीठावर श्री १००८ जगद्गुरू उमापती पंडितराध्य शिवाचार्य हे विराजमान असून ते लोकशिक्षण, धर्मप्रचार समाजजागृती व साहित्याचे प्रकाशन अशी कामे पार पाडतात.

५) **श्री जगद्गुरू विश्वाराध्य (काशीपीठ) –** वीरशैव धर्माच्या प्रतिष्ठापनेसाठी शिवाच्या आदेशावरून श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांनी प्रत्येक युगाच्या आरंभी काशीक्षेत्रातील श्री विरेश्वर ज्योतिर्लिंगापासून अवतार धारण केले असे मानले जाते. वेगवेगळ्या युगात वेगवेगळी नावे प्रसिद्ध होती. वीरशैव धर्माच्या प्रचारासाठी श्री जगद्गुरू विश्वाराध्यांनी काशीत एका धर्मपीठाची स्थापना केली. ते 'काशीपीठ' किंवा 'ज्ञानपीठ' किंवा 'ज्ञानसिंहासन' या नावाने ओळखले जाते. हल्ली ते 'जंगमवाडीमठ' या नावाने ओळखले जाते. अनेक भक्त आजही आपल्या पूर्वजांच्या नावाने येथे लिंगाची स्थापना करतात. त्यामुळे परिसर लिंगमय झाला आहे. या पीठाचे गोत्रपुरुष स्कंद असून शाखा विश्वकर्ण आहे. पं. मदन मोहन मालवीय यांनी 'काशी हिंदू विश्वविद्यालयाची' स्थापना केली आहे. याशिवाय मुघलसम्राट हुमायून, अकबर, जहाँगीर, शहाजहाँ बादशाहांनी या मठास वेळोवेळी दिलेली दानपत्रे आजही मठात उपलब्ध आहेत.

या पाच पीठांच्या गोत्र, सूत्र-शाखा, प्रवर यांना अनुसरून त्यांच्या शिष्यांना 'पंचम' म्हणतात. हिमालयाच्या केदारेश्वरांपासून कर्नाटकाच्या दक्षिणेस रंभापुरी पीठापर्यंत वीरशैवाचे हजारो

शाखामठ आहेत. पूर्वीच्याकाळी त्या ठिकाणी वीरशैवाची वस्ती होती. पण परकीय सत्तेचे आक्रमण किंवा इतर धर्माचा विचार समाजात पसरत गेला आणि नास्तिक विचार समाजात रुजत गेला. मग काही लोकांत छोट्या, मोठ्या देवांची पूजा होऊ लागली. हिंसाचार वाढला, बळी देणे चालू झाले, खरे धर्माचे ज्ञान कोणालाच नव्हते. एकजूट नव्हती. लोकांमध्ये फूट पाडली जाऊ लागली. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, स्त्रिया व शूद्रांवरील अत्याचार, दांभिकपणा या गोष्टी वाढल्या. समाजात गोंधळाची परिस्थिती सुधारण्याची गरज होती. त्यातूनच समाजसुधारक, धर्मसुधारक महात्मे जन्मास आले.

वीरशैवांची वरील माहिती काळानुसार पुसट होत गेली. त्यांचे महत्व कमी होत गेले, वीरशैवांची वचने व तत्वे नाहीशी होत गेली. तसेच ती तत्वे संस्कृत भाषेत असल्याने सर्वसामान्यांना ती समजत नसत. त्यामुळे पुढे ११ व्या, १२ व्या शतकांत संत, समाज सुधारक उदयास आले. हा संतकालखंड किंवा समाजसुधारकांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. त्यामध्ये बसवेश्वरांनी संस्कृतमधील वचने, श्लोक, तत्वे कन्नडमधून लोकांपुढे आणली. त्यामुळे ती सर्वसामान्यांना समजू लागली. बसवेश्वरांना समकालीन असणारे सोन्नलगीचे श्री सिद्धरामेश्वर हे एक संत किंवा शरण होत.

सोलापूर जिल्हा पूर्णपणे भीमा, सीना आणि माण नदीच्या काठावरती वसलेला आहे. सोलापूर जिल्ह्याला योग्य अशी सीमा (मर्यादा) मिळाली आहे सोलापूरच्या नैऋत्येस सांगली, वायव्येला पुणे, पूर्वेला बीड आणि उस्मानाबाद, पश्चिमेला सातारा, दक्षिणेला कर्नाटक राज्यातील विजापूर, आणि उत्तरेला अहमदनगर हे जिल्हे आहेत. सोलापूरचे एकूण क्षेत्रफळ १५,०२१ चौ. कि.मी. इतकी असून १९७१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २२,५३,८४० इतकी होती.

सोलापूर या शहराच्या नावाची उत्पत्ती सोळा आणि पूर या दोन शब्दापासून आहे असे मानले जाते. 'पूर' म्हणजे खेडेगाव. सोळा खेडेगावाची - ओळख या 'सोलापूर' पासून मिळते. पण सोलापूर शहराची सोलापूर मुख्य ठाणे बन्ल्यानंतरच खरी ओळख व माहिती झाली. [३५] अनेक शिलालेखांवरून असे दिसते कि, १२ व्या शतकात येथे कलचुरी घराण्याचे राज्य होते हा काळ सिद्धरामेश्वरांचा काळ म्हणूनही ओळखला जातो [३६] कलचुरी राजा बिज्जळांनी कल्याणल आपली राजवट सुरू केली. त्याप्रमाणे चालुक्य राजा तैल तिसराचा पराभव बिज्जळांनी केला आणि कल्याणवर आपले वर्चस्व स्थापित केले आणि त्यांनी लिंगायत पंथाला (संप्रदायाला) आश्रय दिला [३७] म्हणूनच कदाचित १२ व्या शतकात लिंगायत संप्रदायाची ओळख सर्व जगाला

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

स्पष्टपणे झाली. त्यामध्ये अनेक शरणशरणीचा सहभाग महत्वाचा ठरला. त्यामध्ये सिद्धरामेश्वरांचा उल्लेख प्रामुख्याने बकरावा लागेल.

१२ व्या शतकात श्री सिद्धरामेश्वर होऊन गेले त्यावेळेस सुक्षेत्र सोन्नलगी किंवा सोलापूर हे एक लहानसे खेडेगाव हाते असे दिसते. कलचुरी घराण्याचे राज्य त्यावेळेस असले तरी कोणत्याही ग्रंथात येथील राजाचा उल्लेख मिळत नाही. कदाचित सोन्नलगीमध्ये अधिपती म्हणूनच नन्नप्पा आणि चामलादेवी राज्य करीत असावेत. सोन्नलगीत नन्नप्पा राजा आणि राणी चामलादेवी हे नोळंब घराण्यातील होते [३८] पण सोन्नलगीतील या राजकीय स्थितीला पुरावे किंवा आधार अजूनही मिळालेले नाहीत. त्यामुळे राघवांकरचित ग्रंथामध्ये तसेच इतर लेखकांच्या काही ग्रंथांमध्ये, लोकांच्या सांगण्यावरून राजा नन्नप्पा आणि राणी चामलादेवी यांचे राज्य होते असे मान्य करावे लागेल. सोन्नलगीमध्ये सिद्धरामही होते. व सिद्धरामेश्वरच नन्नप्पा राजा आणि चामलादेवीचे राजगुरु होते. त्यामुळेच तर कदाचित चामलादेवीने सिद्धरामांना सोन्नलगी सुक्षेत्र बनविण्यासठी भूदान केले होते. नन्नप्पा राजा अकाली निवर्तल्यामुळे चामलादेवीच सर्व कारभार पाहत होती.

समाजात हिंसाचार वाढत होता. नास्तिक विचार रुजत होता. रूढी, परंपरा बदलण्याची गरज होती, खऱ्या धर्माचे ज्ञान कोणालाच नव्हते. अत्याचार, दांभिकपणा, जातीयवाद समाजात होता. त्याप्रमाणे परिस्थितीत सुधारणा होण्याची गरज होती. त्यातूनच समाजसुधारक, धर्मसुधारक अशा सिद्धरामांचा उदय झाला.

श्री सिद्धरामेश्वर हे सोन्नलगीचे/सोलापूरचे ग्रामदैवत आहे. अनेक समाजाचे आराध्य दैवत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रातील लोकांचे आराध्य दैवत आहे. सिद्धरामेश्वर हे ऐतिहासिक व्यक्तिमत्व होते पण आज ते देवरुप मानले जाते. सिद्धरामेश्वर ऐतिहासिक व्यक्ति असली तरी कवी राघवांकानी त्यांचे चरित्र पौराणिक पद्धतीने लिहिलेले आहे. महापुरुषाचे चरित्र पुराणसंदर्भानी सांगण्याची पद्धत प्राचीन आहे. हीच बाब राघवांकरचित 'श्री सिद्धरामेश्वर चरित्रे' या ग्रंथात दिसते. २३ व्या शतकाच्या सुमारास हरिहराचार्य व राघवांकचार्य हे मोठे विद्वान गुरू-शिष्य हंपी (विजयनगर) येथे होऊन गेले. हरिहराचार्यांनी देखील अनेक महापुरुष व राजेमहाराजांवर कविता रचिल्या आहेत. त्यांनी सिद्धरामेश्वर चरित्रावर, त्याच्या कार्यावर लिहिलेली काव्य, पुस्तके आहेत. ती म्हणजे हरिहराचार्यच्या 'सिद्धरामेश्वर रगळे' आणि राघवांककृत 'श्री सिद्धरामेश्वर चरित्रे' ही होत.

सिद्धरामेश्वर हे बसव-समकालीन होते यात शंका नाही. हे सत्य वीर साहित्य - ऐतिहासिक कथेवरून स्पष्ट होते. १२ व्या शतकातील शिवशरणशरणींमध्ये बसवण्णा, अल्लमप्रभु, चन्नबसवण्णा, अक्कामहादेवी यांच्या बरोबरीचे सिद्धराम हे ऐतिहासिक व्यक्ती होते असे म्हणावे लागेल. रेवणसिद्ध, बसवण्णा अल्लमप्रभु यांच्या निर्णयाला अनुसरून शासन आणि साहित्यिक आधार (प्रमाण) खालीलप्रमाणे केल्यास त्यांची कालावधी अभ्यासाच्या दृष्टीने आपल्याला समजून येईल.

१) १२ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि १३ व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात हरिहर व राघवांक यांनी आपली काव्ये लिहिलेली असतील असे म्हणावे लागेल.[३९] विरोधकांच्या मते इ.स. १२४५, इ.स. १२६३ किंवा इ.स. १२४० असे दिले आहे. तर इ.स. १२१६ असे संशोधकांनी सिद्ध केले आहे.तसेच राघवांकाचे काव्य व पुराण १२ व्या शतकानंतरचे रचलेले आहे.[४०] श्रीनिवास गोविंद पै यांच्या मते वरील व्यक्तिची काव्यरचना ही इ.स.११४५ पासून इ.स.१२१० किंवा इ.स. १२२० पर्यंत रचलेली असावीत.[४१]

२) १२ व्या शतकाच्या पूर्वार्धात सिद्धराम होऊन गेले. हे राघवांक आणि हरिहराचार्याच्या काव्य आणि 'बसवराज देवर रगळे' 'सिद्धराम चरित्रे' या ग्रंथाच्या लेखनावरून समजते. वीरशैव व्यक्तिच्या लिंगैक्या (समाधी घेतल्या) नंतर त्यांच्या नावाने तेथे लिंग स्थापन केले जाते. तसेच सिद्धरामेश्वरांच्या जन्मसनाबद्दल दुमत आहे. ख्रिस्त सन १२०९ च्या अगोदर सिद्धरामेश्वर लिंगैक्य झाले असावे असे समजावे लागेल.[४२]

३) बसव समकालीन एकोरामी यांचे स्मरण आपल्या वचनातून सिद्धरामाने केलेले आहे. यावरून ते १२ व्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेले असे समजावे.

४) तसेच हाविनहाळ कल्लय्या हे सिद्धरामाच्या समकालीन होऊन गेले असावे असे हरिहराने 'हाविनहाळ कल्लय्यन रगळे' मध्ये सांगितले आहे. बिज्जळ राजाच्या मृत्यूनंतर थोड्या दिवसांनी सिद्धरामांनी समाधी घेतली. त्यावेळी त्यांचे मित्र कल्लय्या, कैतारैय्या आण्णा बोम्मय्या यांचा निरोप घेऊन समाधी घेतली असे राघवांकचार्य आणि हरिहराचार्य सांगतात. कल्लय्याचा जीवनकाळ इ.स. ११९० असा असावा असा उल्लेख असल्याने [४३] त्यांच्या अगोदर म्हणजे इ.स.११८० मध्ये सिद्धरामेश्वर लिंगैक्य झाले असावे यावरून त्यांचा जीवनकाळ १२ व्या शतकातील असावा असा अंदाज काढावा लागेल.

५) बिज्जळ राजा हा सन ११६२ ते ११६७ पर्यंत कल्याणमध्ये राज्य करीत असावा असे लक्षात येते. सिद्धराम चरित्रामध्ये बिज्जळ राजाचा भाऊ कर्णदेव असे न म्हणता नातू म्हटले असल्याचा उल्लेख चुकीचा आहे असे गोविंद पै(श्रीकारपुरद १९७ शासनदल्ली E.C.Vol VII) सांगतात.

बिज्जळाच्या मृत्यूनंतर कर्णदेवाने आपला राज्याभिषेक सिद्धरामानी करावा म्हणून त्यांना बोलावणे पाठविले. यावरून बिज्जळ राजाचा शेवट इ.स. ११६७ मध्ये झाला असल्यास त्या कालावधी नंतर लगेच इ.स. ११६७-११६८ मध्ये कर्णदेवांचा राज्याभिषेक झाला असावा. यावरून सिद्धरामांचा कालावधी इ.स. १२०० शतकाचाच आहे असे स्पष्ट म्हणावे लागेल. कर्णदेवाने त्यांना इ.स. ११६७-११६८ मध्ये कल्याणला आमंत्रित केले होते त्यावेळेस त्यांचे वय ३०-४० वर्षे असेल म्हणजे सिद्धरामांचा जन्म ११३०-११३५ मध्ये झाला असावा.[४४] असे गोविंद पै सांगतात. त्यांच्या जन्म काळाबाबत दुमत आहे. 'श्री सिद्धरामाची त्रिविधी' मध्ये इ. स. ११२७ मध्ये त्यांचा जन्म झाला असावा इसे इतिहासतज्ज्ञांचे मत आहे असा उल्लेख [४५] आहे. कित्येक ठिकाणी इ. स. १०८८ मध्ये जन्म झाल्याचा उल्लेख आहे. पण तो योग्य नाही असे वाटते. कारण वरील सर्व बाबी पाहता त्यांचा जन्म इ. स. ११३० मध्ये होऊन इ. स. ११८० मध्ये ते लिंगैक्य झाले असावे हे सध्याची उपलब्ध साधने पाहता तरी खरे मानावे लागेल. [४६]

रेवणसिद्ध गुरूंनी सिद्धरामांच्या जन्माबद्दल भविष्य वर्तविले. त्यांनी सोन्नलिगीला जाऊन सुग्गवैयेच्या पोटाला स्पर्श करून सिद्धरामाचे जननसंकेत वर्तविले असा हरिहराचार्यांनी 'रेवणसिद्धेश्वर रगळे' आणि राघवांकानी 'सिद्धराम चरित्रे' मध्ये उल्लेख केलेला आहे. गोविंद पै यांनी रेवणसिद्धेश्वराचा कालावधी इ.स. १०९५ ते इ.स.११८७ पर्यंतचा असावा असा अंदाज व्यक्त केला आहे.[४७] रेवणसिद्धेश्वर हे १४०० वर्ष जगले असे हरिहराचार्यांनी आपल्या 'रेवणसिद्धेश्वर हगळे ' मध्ये सांगितले आहे. पण हे अशक्य वाटते. ते दीर्घायुषी किंवा शतायुषी असतील एवढेच शक्य आहे असे वाटते. इ.स. ११८० मध्ये सिद्धारामांनी समाधी घेतली. इ. स. ११८७ पर्यंत रेवणसिद्धेश्वर जिवंत होते असे म्हणणे योग्य वाटत नाही कारण, सिद्धरामेश्वरांच्या जन्माबद्दलची भविष्यवाणी करतानाच ते ६०-७० वर्षाचे वृद्ध होते असे कवी राघवांक आपल्या 'सिद्धराम चरित्र' मध्ये सांगतात.[४८] जर ते इ.स. ११३० मध्ये ६०-७० वर्षाचे वृद्ध होते तर इ.स. ११७० मध्ये ते लिंगैक्य झालेले असावेत हे खरे असेल तर इ.स. ११८७ शिरवाळ शासनामधील सिद्धरेवण हे वेगळे व रेवणसिद्ध हे वेगवेगळे असू शकतील असे म्हणावे लागेल. इ.स. ११६७ मध्ये कल्याणमध्ये झालेल्या वीरशैव आंदोलनात बसवण्णा, अल्लमप्रभु आणि सिद्धराम होते पण तेथे रेवणसिद्ध गुरू नव्हते पण त्यांचे पुत्र रुद्रमनी मात्र तेथे उपस्थित होते. तसेच कल्याणमध्ये भरलेल्या अनुभव मंटपाच्या आकर्षणापासून ते दूर कसे राहू शकले असते ? असा प्रश्न सहज उभा राहतो. यावरून तोपर्यंत ते लिंगैक्य झाले होते हे असंभव नव्हे असे म्हणावे लागेल.

सिद्धराम शिवयोगी अनुभव मंडपात हजर होते ते बसवसमकालीन होते. तसेच त्यांनी कल्याणमध्ये वीरशैव आंदोलनात भाग घेतला होता. यावरून त्यांचा जन्म इ.स. ११३० ते इ.स. ११३५ दरम्यान झाला असावा हे पै यांचे मत मान्य करावे लागेल. म्हणजेच इ.स. ११३० ते इ.स. ११३५ दरम्यान जन्म आणि इ.स. ११८० मध्ये ते लिंगैक्य झाले हे सध्याच्या क्षणाला तरी मान्य करावे लागेल.[४९]

सिद्धरामेश्वरांचे जीवनचरित्र

(सिध्दरामेश्वरांची मूर्ती)

१२ वे शतक हे अनेक घडामोडींचे व संघर्षाचे, तसेच शांततेचे असे होते. कारण एका बाजूने राजकीय चळवळी जेवढ्या मोठ्या प्रमाणात झाल्या तेवढ्याच वेगाने धर्मसुधारकांच्या प्रयत्नांना यश आलेले ही दिसून येते म्हणून या कालखंडाला 'सुधारणा युग' म्हणतात. त्या वेळच्या या सर्व व्यक्ती ऐतिहासिक, साहित्यिक व्यक्ती म्हणून ओळखल्या जातात. इतिहासामध्ये हे एकच शतक असे होते की, एक-दोन नव्हे तर अनेक असाधारण व्यक्तींचा समावेश एकाच शतकात झाला. डॉ. कोट्टरशेट्टी एम.बी. यांच्या मते कन्नड भूमी ही पुण्यवान आहे. कारण या एकाच शतकात त्या भूमीवर अनेक आदर्शवादी, धर्म आणि जनहितवादी, असाधारण लोक एकत्र आले. मग ही भूमी पुण्यवान नाही तर काय ? याला कारण शिवशरणांमध्ये अनेक शरण व शरणी कर्नाटकात एकत्र येऊन साहित्यिक, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात त्यांनी विजय मिळवून दिले. हे पौराणिक किंवा काव्य म्हणून त्यांच्याकडे

पाहण्यापेक्षा त्यांच्या जीवनाविषयी ऐतिहासिक दृष्टीने पाहून त्यांचे जीवन व कार्याविषयी अभ्यास करावा लागेल.[५०]

सिद्धराम शिवयोगी जीवनचरित्र लिहिण्यास साहित्यिक व शासकीय आधार आहेत. पण सिद्धरामांच्या माता-पित्यांच्या नावांबद्दल आणि त्यांच्या जीवनकालखंडाबद्दल साधने शासनामध्ये उपलब्ध नाहीत. ही एक दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. जसे बसवण्णाच्या आईवडिलांचे नांव, त्यांचे कुलगोत्राविषयीची माहिती अर्जुनवाडच्या शिलालेखात असल्याचा उल्लेख आढळतो.[५१] सिद्धराम शिवयोगी जीवन चरित्रामध्ये त्यांनी कल्याणला गेल्याचा उल्लेख व चन्नबसवण्णांकडून दीक्षा घेतल्याचा (लिंगधारणा) उल्लेख यामध्ये दुमत आहे. सिद्धराम शिवयोगी जीवन चरित्राला मूलभूत मानलेले ग्रंथ म्हणजे राघवांकाचे 'सिद्धराम चरित्र' आणि हरिहराचार्यांचे 'रगळे' हे एका दृष्टीने महत्वाच्या ग्रंथ, व्यक्ती असे म्हणावे लागेल. या शिवशरणांचे जीवनचरित्रा विषयी ऐतिहासिक संगतीची माहिती करून घ्यायला जागरूक असावे कारण महाकाव्य, पौराणिक पद्धतीने सांगितले जात होते. असा उल्लेख या अगोदर केला आहे. अनेक वचन काव्य, महाकाव्य, पौराणिक कथा, राघवांकाचे व हरिहराचार्य 'रगळे' तसेच प्रामुख्याने बसवपुराण (१३६९); लिंगनीला विशाल चारित्र (१४३०); प्रभू लिंगलिले (१४३०); शून्य संपादने मधील चार प्रकरणे, चन्नबसवण्ण पुराण (१५८१); सिद्धनंजेसन राघवांक चारित्र (१५५०) या ग्रंथांमध्ये इतर शरणांबरोबर सिद्धरामेश्वरांचा उल्लेख आलेला आहे. वरील सर्व ग्रंथातील काल्पनिक संकल्पना सोडून खऱ्या ऐतिहासिक उल्लेख कराव्या लागतील. वरील ग्रंथांमधून उपलब्ध चारित्रीक साधने यांचे विश्लेषण करून घेऊन जीवनचरित्र लिहावे लागेल.

लोकांमध्ये धार्मिक जीवन अधोगतीला लागतानाच विश्वशक्ती महासंदेश घेऊन त्या काळात धार्मिक महापुरुषांचा अवतार होतो असे पुराणकल्पना व परंपरे नुसार समजते. ही परंपरा फक्त हिंदू संस्कृतीला लागू नसून पैगंबरांना सुद्धा लागू असल्याचा उल्लेख आहे. [५२] जसे महम्मद पैगंबराचा जन्म होण्यापूर्वी अरबस्तानाच्या कानाकोपऱ्यातून भविष्यवाणी (Prophesies) ऐकू आली. येशू ख्रिस्तांचा जन्म होण्यापूर्वीही आकाशवाणी झाली होती.[५३] अपूर्व ज्ञानशक्ती, योगसामर्थ्य लाभलेल्या दार्शनिकांना भूत, वर्तमान आणि भविष्य हे एकाच वेही ग्रहण करण्याची अखंड दृष्टी प्राप्त झालेली असते. तसेच अखंडकाल प्रज्ञा, दार्शनिक दृष्टी विकसित झालेली असते. अशा महात्म्यांना भूत आणि वर्तमान जसे ज्ञात असते तसेच भविष्यही ज्ञात असते.

सिद्धरामांच्या जन्मापूर्वीही श्री रेवणसिद्ध या सिद्धपुरुषांने भविष्य वर्तविले होते. हे ऐतिहासिक भविष्य राघवांक व हरिहर यांनी आपल्या काव्यामधून स्पष्ट केलेले आहे यात शंका नाही.[५४] रेवणसिद्ध हे त्रिकालज्ञानी होते सिद्धपुरुषांच्या मालिकेतील सिद्ध संप्रदायामधील ते एक महान सिद्धपुरुष होते.

सोन्नलगीला येण्यापूर्वी कल्याण, कोल्हापूर, मंगळवेढा, माचणूर मधून संचार करीत असताना,[५५] माचणूर येथे एकदा रेवणसिद्ध ध्यानस्थ असताना त्यांना दैवी दृश्य दिसले. त्यांनी ते भविष्य सोन्नलगीयेथील मुद्दगौडा-सुग्गलादेवी यांना येऊन सांगितले असे हरिहराच्या 'रेवणसिद्ध रगळे' वरून समजून येते. वृद्ध व रजोधर्म संपलेल्या सुग्गलाच्या पोटाला स्पर्श करून विनासंगती ती एका मुलाला जन्म देईल अशी भविष्यवाणी रेवणसिद्धांनी वर्तविली. आजच्या युगात हे सर्व अशक्य वाटते. तरी हरिहराने 'सिद्धरामेश्वररगळे' व राघवांकांचे 'चरित्र' तसेच काही काव्यातून सोलापूर ही सिद्धरामांची जन्मभूमी आहे अशी भविष्यवाणीही सांगितली आहे. राघवांकाने 'सुवर्णवल्ली' असा उल्लेख एका काव्यात केला आहे. श्रीशैल मल्लिकार्जुन हे सिद्धरामेश्वरांचे आराध्य दैवत होते. प्रभुदेव सोन्नलगीला आल्याचे उल्लेख 'शून्यसंपादने संकलन' मध्ये आढळते. सोन्नलिगीला लिंगस्थापन करून योगरमणीय क्षेत्र बनविले असल्याचे आढळते. हे अनेक शिलालेखांवरून स्पष्ट होतें. कारण अनेक महाराज, महामंडळे आणि काही शासनांनी सिद्धरामांनी स्थापन केलेल्या मल्लिकार्जुन मंदिरात दान दिलेले आढळते. ते अनेक शासनाच्या वतीने हे मंजूरही करण्यात आले होते, असा उल्लेख सर्व वीरशैव पुराणामध्ये आढळतो. सिद्धराम शिवयोगीचे जन्मस्थान व कर्मस्थान, तपोभूमी व त्यांचे समाधिस्थान (गद्दगी) अशी तीनही [५६] पवित्र स्थाने या सोलापूरात असल्यामुळे या पावनक्षेत्राला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे यात शंका नाही.

बसवेश्वर, अल्लमप्रभू यासारख्या महाव्यक्ती वीरशैव अवतारी पुरुष म्हणून ओळखल्या जातात. हरिहरांनी अनेक महान व्यक्तींची चरित्रे लिहिलेली आहेत. त्यामध्ये या अवतारी पुरुषांना कोणत्या तरी चुकीमुळे शाप मिळाल्याने या भूमीवर जन्म घ्यावा लागला असा उल्लेख आढळतो.[५७] सिद्धराम शिवयोगी हे अवतारी पुरुष होते असा उल्लेख राघवांकाने केलेला आहे. परमेश्वरांनी सिद्धरामांना भूलोकी जन्म घेण्यास सांगितल्याचे राघवांक व हरिहर आपल्या काव्यातून व्यक्त करतात. याबद्दलची कथा उल्लेखात आहे ती अशी-

अद्रशीर व ऊर्ध्वशीर हे गंधर्व परमेश्वराच्या दर्शनाला जात असताना रस्त्यात भृंगीश्वरांचा विद्रुप चेहरा पाहून हसले. हे दोघे आपणास बघून हसले असे समजून भृंगीश्वर अतिशय रागावले आणि त्यांनी त्या दोघांना भूलोकी (मृत्यूलोक) जन्म घ्यावयाचा शाप दिला. त्यानंतर त्या दोघांनी उ:शाप मिळण्यासाठी त्यांना विनवणी केली. त्यावेळेस भृंगीश्वरांनी त्यांना सांगितले की, ''पापण्या न हालणारा, श्वासोच्छवास न करणारा अन्नसेवन न करणारा, जितेंद्रिय, मायाविरहित, अघटित महत्वाचे प्रसिद्धीस येणारा व शिवज्ञानी असा पुत्र जेव्हा तुम्हास होईल तेव्हा या शापापासून तुम्ही मुक्त व्हाल. या पुढचा खुलासा तुम्ही परमेश्वराकडून करून घ्या''. त्यावेळेस ते दोघे परमेश्वराकडे गेले परमेश्वरांनी अद्रशीर व

उर्ध्वशीर या दोघांना स्त्री-पुरुष रूपाने सोन्नलगीगावाचे पाटील (कुडवक्कलगेर) जातीचे घराणे होते, त्यात सोमदेवाचा मुलगा मुद्दगौडा (मोर्डीमुद्दय्या), दुसऱ्या कुळात मंगळवेढा येथील शांतविरय्या यांची कन्या सुग्गलादेवी [५८] या नावाने जन्म घ्यावयास सांगितले अशी कथा राघवांकाने सिद्धराम शिवयोगीचा जन्म मृत्यूलोकात होण्यास कारण म्हणून सांगितलेली आहे.[५९] सिद्धरामेश्वराच्या जन्माची काल्पनिक कथा राघवांकानी रचलेली आहे, सिद्धराम शिवयोगी हे विष्णूचे अवतार ही कल्पना वीरशैव साहित्यामध्ये आढळते. विष्णू हे ब्रह्मा, विष्णू, शिव या त्रिमूर्तीपैकी एक आहे. त्यांच्या बरोबर असलेल्या अनेक कथा कल्पना शैव वीरशैव पुराणांमध्ये आढळतात.

माता – पिता आणि भविष्यवाणी : सिद्धरामाच्या माता-पित्याचे नाव सुग्गलादेवी आणि मुद्दगौडा (मुद्दय्या) असे राघवाकांनी 'सिद्धराम चरित्रे' मध्ये सांगितले आहे. शापित असलेले अद्रशीर व उर्ध्वशीर हे गंधर्व, मृत्यू लोकांत कुडवक्कलगेर पाटील घराण्यात पुरुष रूपाने मोर्डीमुद्दगौडा या नावाने एकाने जन्म घेतला. मुद्दगौडांच्या वडिलांचे नाव सोमदेव असे होते. आणि दुसऱ्याने मंगळवेढ्यातील शांतविरय्या यांच्या कुळात स्त्री रूपाने सुग्गलादेवी या नावाने जन्म घेतला.[६०] आजही वीरशैव धर्मामध्ये आपल्या मुलांचे नाव मुद्दगौडा आणि मुलीचे नाव सुग्गला असे ठेवले जाते.[६१] पाटील मुद्दगौडा व त्यांची पत्नी सुग्गलावा हे उभयता सदाचारसंपन्न व सुशील होते. दया, शांती, क्षमा हे त्रिगुण ऐश्वर्य त्यांना लाभले होते.[६२] असे राघवांकाने वर्णिले आहे. अशा सुग्गलाव्वाचा अनुरूप असलेल्या मुद्दगौडाशी विवाह झाला. त्यांच्या संतानाबद्दल दुमत आहे. एक मत असे आहे कि, ते दोघेही पती-पत्नी बरेच वयस्कर होईपर्यंत त्यांच्या पोटी पुत्रसंतान नव्हते.[६३] पण राघवांकानी सांगितल्याप्रमाणे सुग्गलाव्वाने ५-६ मुलांना जन्म दिला असावा. सिद्धरामाचा थोरला भाऊ ज्याला सिद्धरामांनी दीक्षा दिली असे राघवांक सांगतात.[६४] इतरांचे नाव सिद्धरामचरित्रेमध्ये सुशील, सुनीति, सुभाशिता, शिवदेवी, सर्वमंगलादेवी, काव्यायनी सुप्रभादेवी आणि शिवानंदा देवी [६५] असे होते असे सांगितले जाते. या दाम्पत्याचे कुलदैवत 'धुळीमांकाळ' हे होते. आपल्या कुलदैवताला सुग्गलादेवी अनेक वेळा संतानप्राप्तीसाठी नवस बोलत होती. कित्येक उपवास, आचरण करीत होती. कित्येक दिवस, महिने आणि वर्षे उलटली तरी त्यांना संतानप्राप्ती झाली नाही. त्यामुळे उभयतानी नात्यातील एका बालकाला आपल्या जवळ ठेवून घेतले. त्याचेच नाव 'बोम्मय्या' असे ठेवण्यात आले [६६]

त्रिकालकाली रेवणसिद्ध सुग्गलाव्वाला भविष्य सांगण्याठी कल्याण, कोल्हापूर, मंगळवेढा, आणि माचणूरहून संचार करीत करीत, सोन्नलगीच्या मुद्दगौडा आणि सुग्गलादेवी यांच्याकडे आपल्या शिष्य परिवारासह पालखीतून निघाले. सोन्नलगीदिसू लागताच त्यांनी पालखीतून उतरून हात जोडून भूमीला नमस्कार केला. हे पाहून त्यांच्या शिष्यगणांना आश्चर्य वाटले. आपल्या पायात खडावा न घालता

अनवाणी येऊन थांबले (आजही सोलापूर शहराबाहेर विजापूर रस्त्यावर कंबर तलावाजवळ श्री रेवणसिद्धेश्वरांचे मंदिर आहे. त्या जागी त्यांनी शिवपूजा केली होती. आणि आपल्या खडावा येथेच सोडल्या होत्या [६७] अनवाणी चालत सिद्धरामांच्या मातापित्याच्या घरी सोन्नलगी गावाकडे आले. (जोडभावी पेठेजवळ जून्या कोर्टाकडून मोठा रस्ता जातो त्याच्या उजव्या बाजूस जे सिद्धेश्वर देवालय आहे. तेथेच मूळ सोन्नलगीगाव होते. आणि तेथे सिद्धरामाचा जन्म झाला आता सोलापूर असे नाव प्रचलित आहे.) याबद्दलची सविस्तर कथा श्री सिद्धरामेश्वर पुराणात मिळते.[६८] रेवणसिद्ध गुरुंचे स्वागत मुद्दगौडा आणि सुग्गलाव्वा या दाम्पत्याने मोठ्या उत्साहाने केले. आणि रेवणसिद्धांनी भविष्य वर्तविण्यास सुरुवात केली 'अव्वा । तुझी पुण्याई थोर। तुझ्या उदरी महान पुण्यवान, शिवस्वरूप योगी जन्म घेणार आहे. सोन्नलगी खेड्याला तो अभिनव श्रीशैल बनविणार आहे'. तिच्या पोटाला स्पर्श करून नमस्कार करून भविष्य वर्तविले. ही भविष्यवाणी सोन्नलगीयेथे सांगितली असा हरिहर यांच्या 'रेवणसिद्ध रगळे' मध्ये उल्लेख आहे. शारीरिक मासिक धर्म थांबलेली सुग्गलाव्वा म्हणाली, 'हे सर्व कसे शक्य आहे? मी फार वृध्द झाले आहे. मुले होण्याचे माझे वय कधीच पालटले आहे.' तेव्हा रेवणसिद्धांनी स्त्री - पुरूषांच्या संयोगाने किंवा शुक्र-शोणितांच्या संयोगाने नव्हे तर तो उपयोनी संभव आहे. तू त्याची निमित्तमात्र माता होशील' असे सांगून नवजात बालकाचे 'सिद्धराम' असे नाव ठेवण्यास सांगितले. (सोलापूर नगराच्या पूर्व भागातील गुरुवार पेठेत सोन्नलगीसिद्धरामांचे मंदिर आहे. त्याच जागी योगीयांच्या या राजाचा जन्म झाला होता. जवळच रेवणसिद्धेश्वरांच्या पादुका असलेले एक देऊळ आहे. पाटलांच्या घरी याच ठिकाणी बसून रेवणनाथांनी हे अलौकिक भविष्य सांगितले होते.)[६९] आणि ते निघून गेले. ही जनहिताची गोष्ट हरिहर आणि राघवांक यांना समजून आली असेल [७०] आणि ती तसे असेल असे आपणास मानावे लागेल कारण सिद्धराम शिवयोगींचे जन्मस्थल आणि जीवन कार्यक्षेत्र आणि समाधी या विषयांमध्ये भिन्न अभिप्रायाला जागा नाही, सोलापूरात कपिलसिद्ध मल्लिकार्जुनदेवालय आहे, योगीनाथ गुहा सिद्धरामानी निर्माण केली आहे हे १२ व्या शतकापासून आजपर्यंत प्रचारात आहेत.

तळटिपा

१. डॉ. कपाळे चंद्रशेखर	वीरशैव धर्माचा स्थूल इतिहास, श्रीकाशी जगद्गुरु विश्वराध्य वीरशैव विद्यापीठ, विजापूर रोड, सोलापूर; सन १९९७, (पृ. ७,८)
२. मंचरकर रत्नाकर	वीरशैव संप्रदाय, डॉ. वा.ग.कल्याणकर, गौरवसमिती प्रकाशन, सोलापूर; सन १९८९ (पृ. २६)
३. कित्ता,	(पृ. क्र. २७)
४. कित्ता, कपाळे चंद्रशेखर	वीरशैव धर्माचा स्थूल इतिहास (पृ. क्र. ९,११,१२)
५. कित्ता,	(पृ. क्र. ३१,३२)
६. कित्ता,	(पृ. क्र. ३४)
७. कित्ता	(पृ. क्र. ३५)
८. कित्ता	(पृ. क्र. ४२)
९. कित्ता	(पृ. क्र. ३६)
१०. कित्ता	(पृ. क्र. ३७)
११. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा.	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ५८)
१२. कित्ता,	(पृ. क्र. ५९)
१३. कित्ता,	(पृ. क्र. ६०)
१४. कित्ता,	(पृ. क्र. ६१)
१५. कित्ता,	(पृ. क्र. ६६)
१६. डॉ. पसारकर शें. दे.	अष्टावरण, श्री काशी जगद्गुरु विश्वाराध्य; वीरशैव विद्यापीठ, जंगमवाडी मठ,वाराणसी, प्रथम आवृत्ती सन १९९७; शेवटची आवृत्ती २००३ (पृ. ५,६)
१७. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय (पृ. क्र. ७६)
१८. कित्ता, पसारकर	अष्टावरण, (पृ. क्र. १८ ते २४)
१९. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ७७)
२०. शिवाचार्य चंद्रशेखर महास्वामिजी	सिद्धान्तशिखामणी, वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर; सन १९९० (पृ. क्र. २५५)

२१. कित्ता, पसारकर	अष्टावरण, (पृ. क्र. २७, २८)
२२. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ७८)
२३. कित्ता, पसारकर	अष्टावरण, (पृ. क्र. ३९,४०)
२४. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ७९)
२५. कित्ता, पसारकर	अष्टावरण, (पृ. क्र. ४२,४३)
२६. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ७९)
२७. कित्ता,	(पृ. क्र. ८०)
२८. कित्ता, पसारकर	अष्टावरण, (पृ. क्र. ३० ते ३५)
२९. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ८०)
३०. खके शिवप्पा	पंचाचार, श्री काशी जगद्गुरु विश्वाराध, वीरशैव विद्यापीठ जंगमवाडी मठ, वाराणसी; प्रथम आवृत्ती सन १९९७; शेवटची आवृत्ती २००३, (पृ. ९)
३१. कित्ता ,	(पृ. क्र. २०)
३२. कित्ता,	(पृ. क्र. ३७)
३३. कित्ता, डॉ.मंचरकर र.बा	वीरशैव संप्रदाय, (पृ. क्र. ८१)
३४. कित्ता, खके	पंचाचार (पृ. क्र. ३७, ४४)
35. Solapur District Maharashtra State Gazetter of India	Bombay Gazetters department, Govt. of Maharashtra; 1977; (Page No. 1)
36. Ibid,Solapur Gazetter	(Page No. 2)
37. Ibid,Solapur Gazetter	(Page No. 44)
३८. मडकी शशिकलाताई	सिद्धरामेश्वर वचनांजली, बसव महामने चॅरिटेबल ट्रस्ट, राजाजी नगर, बेंगळुरु; सन १९९३ (पृ. क्र. १२)
३९. हिरेमठ आर. सी.	महाकवी राघवांक, शारदा मंदिर, म्हैसूर; सन १९६६ (पृ.क्र. ३८)
४०. नरसिंहाचार्य डी.एल.	सिद्धराम चरित्रेसंग्रह, जयनगर, म्हैसूर; सन १९८४ (पृ.क्र. २२
४१. कित्ता,	(पृ. क्र . १०)
४२. कोट्टरशेट्टी एम. बी.	सिद्धराम शिवयोगी; कन्नड अध्ययन पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड; सन १९७५ (पृ. क्र. ६५)
४३. कित्ता, हिरेमठ	महाकवी राघवांक, (पृ.क्र.२४)

४४. **रेणुकाचार्य कालनिर्णय शरणसाहित्य संपुट** –८ सं. २ -३

४५. लिगाडे जयदेवीताई (अनुवादिका) — श्री सिद्धरामांची त्रिविधी, कन्नड कोटी प्रकाशन, सोलापूर; सन १९५८ (पृ.क्र. १)

४६. **कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.** — सिद्धराम शिवयोगी, (पृ.क्र. ६७)

४७. **कित्ता, रेणुकाचार्य कालनिर्णय शरणसाहित्य संपुट सं.** (पृ.क्र. २,३)

४८. **कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.** — सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ६७)

४९. **कित्ता,** (पृ.क्र. ६८)

५०. **कित्ता,** (पृ.क्र. ६९)

५१. कित्ता, (पृ.क्र. ६९)

५२. कित्ता, (पृ.क्र. ७१)

५३. कित्ता, (पृ.क्र. ७१)

५४. कित्ता, (पृ.क्र. ७५)

५५. कित्ता, (पृ.क्र. ७५)

५६. **कित्ता,** (पृ.क्र. ७६)

५७. **कित्ता,** (पृ.क्र. ७१)

५८. डॉ. स्वामी इरेश — श्री सदगुरु महाशिवयोगी सिद्धरामेश्वर पुराण (राघवांकरचित), श्री महाशिवयोगी सिद्धेश्वर देवस्थान पुजारी मंडळ, सोलापूर; सन २००१ (पृ. क्र. ९).

५९. **कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.** — सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७१)

६०. कित्ता, (पृ.क्र. ७३)

६१. कित्ता, (पृ.क्र. ७४)

६२. **कित्ता, मडकी शशिकलाताई** — शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, राजशेखर चंद्रशेखर मडकी, बसव मंटप, राजकला मार्ग, मंगळवार पेठ, सोलापूर;२००१ (पृ. क्र. २)

६३. स्वामी विभूतीमठ ईश्वरय्या विरय्या — सिद्धरामेश्वर महात्म्यदर्शन सचित्र चरित्र, चनबसय्या ईश्वरय्या स्वामी (विभूतीमठ) सन १९९३ (पृ. क्र. ३)

६४. **कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.** — सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७४)

६५. **कित्ता, स्वामी इरेश** — श्री सदगुरु महाशिवयोगी सिद्धरामेश्वर पुराण (पृ.क्र. १०)

६६. **कित्ता, मडकी शशिकलाताई** — शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. २)

६७. **कित्ता, मडकी शशिकलाताई** सिद्धरामेश्वर वचनांजली (पृ.क्र. १)

६८. **कित्ता, विभूतीमठ** सिद्धरामेश्वर महात्म्यदर्शन सचित्र चरित्र (पृ.क्र. ३)

६९. **कित्ता, मडकी शशिकलाताई** शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. ६)

७०. **कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी** सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७५)